






# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026








❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१७१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.१ आगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## भाजपची सूत्रे येणार महाराष्ट्राच्या हाती ? देवेंद्र फडणवीस होणार राष्ट्रीय अध्यक्ष ? मोदींच्या भेटीनंतर चर्चाना जोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

महाराष्ट्र भाजपचे महत्त्वाचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. अशात फडणवीस यांनी नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कुटुंबियांसह भेट घेतली ती. त्यानंतर या चर्चाना जोर आला आहे.त्यामुळेचभाजपची सूत्रे आता महाराष्ट्राच्या हाती येणार असल्याची चर्चा आहे.भाजपचे सध्याचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांची केंद्रीय मंत्रिमंडळात निवड झाल्याने भाजप त्यांना पक्षाच्या बाबदारीतून मुक्त करणार आहे. त्यामुळे या पदासाठी ज्या नावांची चर्चा सुरू आहे, त्यामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव आघाडीवर आहे. याबाबतचे वृत्त द न्यू इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

जेपी नड्डा यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ यापूर्वीच संपला होता, पण त्यांना मुदतवाढ देण्यात आली होती. आता केंद्रात पुन्हा सरकार स्थापन झाल्यानंतर भाजपने नव्या अध्यक्षांचा शोध सुरू केला आहे. यामध्ये दोन प्रमुख नावे महाराष्ट्रातून आहेत. त्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे




यांच्या नावाचा समावेश आहे.भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची चर्चा सुरू झाल्यानंतर काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यावेळी त्यांच्यासोबत पत्नी अमृता आणि कन्या दिवीजाही उपस्थित होत्या. या भेटीनंतर 'भाजप फडणवीस यांच्याकडे मोठी जबाबदारी देणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या.

गेल्या काही काळापासून अध्यक्षपदाच्या चेहऱ्याचा शोध सुरू असताना काही नावांवरून भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघात एकमत होत नव्हते. मात्र, फडणवीस यांचे नाव समोर आल्यानंतर एकमत झाल्याचे, सूत्रांनी सांगितले आहे.या सूत्रांनी पुढे सांगितले की, फडणवीस यांना अध्यक्ष करायचे की एनडीएच्या मंत्रिमंडळात घ्यायचे याबाबत भाजमध्ये संभ्रम आहे. मात्र, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला वाटते की, फडणवीस यांना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद द्यावे. कारण यामुळे राष्ट्रीय राजकारणात दीर्घकाळ काम करण्यासाठी फडणवीस चांगल्या प्रकारे तयार होतीत.

देवेंद्र फडणवीस हे नागपूरचे आहेत. जिथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आहेत. त्यामुळे ते संघाच्या जवळचे आहे. इतकेच नव्हे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फडणवीसांचे चांगले संबंध असल्याने त्यांच्या अध्यक्षपदाच्या वाटेतील सर्व अडथळे दूर होत आहेत, असेही सूत्रांचे म्हणणे आहे.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात जोरदार फटका बसला. यासह त्यांच्याबाबत विविध समाजातमध्ये नकारात्मकतेचे वातावरण आहे. अशात त्यांना राज्यात ठेवणे पक्षाच्या हिताचे ठरणार नाही, म्हणून पक्ष त्यांना राष्ट्रीय राजकारणात आणत आहे, आरएसएसच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानेही याला दुजोरा दिला आहे.

## कुणाला संपवायचं असेल तर मनगटात दम लागतोय : मुख्यमंत्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ मुंबई**

राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांकडून आरोप-प्रत्यारोप सुरु झाले आहेत. अशातच विधानसभेच्या पार्श्वभूमीवर काल उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना इशारा दिला आहे. एकतर तू राहशील नाहीतर मी अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.



एखाद्याला संपवायचं असेल तर मनगटात दम लागतोय, घरात बसून फेसबूकवरुन सरकार चालवणाऱ्यांचं ते काम नाही, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला आहे. तसंच, राज्यात सुरू असलेल्या विकासामुळं विरोधक बिथरले असून त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

महाविकास आघाडीची अडीच वर्षे आणि आमच्या महायुतीच्या सरकारची दोन वर्षे यांची तुलना करता लोकांना समजेल. राज्यात सुरू असलेल्या विकासकामांमुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळेच पातळी सोडून टीका केली जाते. एखाद्याला संपवायचं असेल तर मनगटात दम लागतो. घरात बसून फेसबुकवरून सरकार चालवणाऱ्यांचं ते काम नाही. असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

## ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राची पताका! कोल्हापूरच्या स्वप्नील कुसाळेचा पराक्रम; भारताच्या खात्यात तिसरं 'ब्राँझ'



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१पॅरिस**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राच्या लेकाने अंतिम फेरीत धडक मारली अन् मोठे यश मिळवले. मूळचा कोल्हापूर येथील असलेल्या स्वप्नील कुसाळेने बुधवारी ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात अंतिम फेरीचे तिकीट मिळवले. अंतिम फेरीत मातब्बर खेळाडू मैदानात होते. फायनलमध्ये सुरुवातीला स्वप्नील सहाव्या स्थानी होता. अंतिम फेरीत एकूण आठ स्पर्धक होते.प्रत्येक नेमबाजाला ४० शॉट्सची संधी होती. हे शॉट्स पूर्ण झाल्यानंतर सर्वात कमी गुण असलेले दोन खेळाडू स्पर्धे बाहेर झाले. नंतर प्रत्येक एका शॉटनंतर सुवर्ण आणि रौप्य पदक निश्चित होईपर्यंत प्रत्येक १-१ खेळाडू बाहेर होत गेला.

Kneeling ची अर्थात पहिली फेरी पूर्ण होईपर्यंत स्वप्नील पाचव्या स्थानावर होता. आता स्टँडिंग शॉट्स पदकांचे चित्र स्पष्ट करणारे होते. यात स्वप्नीलने चमकदार कामगिरी करत तिसऱ्या स्थानापर्यंत मजल मारली. या राऊंडच्या अखेरपर्यंत यूक्रेनचा खेळाडू अव्वल तर चीनचा दुसऱ्या आणि भारताचा स्वप्नील तिसऱ्या स्थानावर राहिला. या घडीला पाच स्पर्धक स्पर्धेत जिवंत होते. पण यातील एक खेळाडू स्पर्धेबाहेर झाल्याने स्वप्नीलचे पदक पक्के झाले. कारण स्वप्नील आणि चौथ्या क्रमांकावर असलेल्या खेळाडूच्या गुणांमध्ये फार फरक होता. त्यामुळेच तिसऱ्या क्रमांकावर असलेला स्वप्नील पदक आणणार हे जवळपास निश्चित झाले. अखेर स्वप्नीलने ऐतिहासिक कांस्य पदक जिंकलेच. विशेष बाब म्हणजे खाशाबा जाधव यांच्यानंतर पदक जिंकणारा स्वप्नील महाराष्ट्रातील पहिला खेळाडू ठरला आहे.

### ऑलिम्पिकमध्ये पदक पटकवणाऱ्या स्वप्नील कुसळेचं अभिनंदन

दरम्यान, ऑलिम्पिकमध्ये स्पर्धेत कोल्हापूरच्या स्वप्नील कुसळे यांने नेमबाजी प्रकारात कांस्य पदक मिळवलं. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वप्नील कुसळे याचं अभिनंदन केलं. ऑलिंपिकमध्ये नेमबाजीत कांस्य पदकाचा वेध घेणारा स्वप्नील कुसाळे हा महाराष्ट्राचा अभिमान आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वप्नीलचं अभिनंदन केलं आहे. ते म्हणाले, स्वप्निल कुसाळेनं ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी चांगली कामगिरी केल्याबद्दल त्याचं आणि त्याच्या पालकांचं अभिनंदन करतो. महाराष्ट्र सरकार स्वप्निलला सर्वकाही सहकार्य करेल.

## छत्रपती संभाजीराजेंवर केलेल्या 'त्या' विधानावरून वाद

### जितेंद्र आव्हाडांच्या कारवर हल्ला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड हे ठाण्याच्या दिशेने जात असताना त्यांच्या कारवर काही कार्यकर्त्यांनी हल्ला केला आहे. छत्रपती संभाजीराजे यांच्या स्वराज्य संघटनेचे हे कार्यकर्ते असल्याचं बोललं जातं. संभाजीराजेंना आता छत्रपती म्हणण्याचा अधिकार नाही असं विधान आव्हाडांनी केले होते. त्यामुळे स्वराज्य संघटनेकडून जितेंद्र आव्हाडांना धमकी देण्यात आली होती. त्यानंतर आज हा हल्ला झालेला आहे.

मुंबईत आज जितेंद्र आव्हाडांची पत्रकार परिषद होती. ही पत्रकार परिषद संपल्यानंतर आव्हाड त्यांच्या ठाण्यातील निवासस्थानी निघाले होते. त्यावेळी वाटेत वाहतूक कोंडीत आव्हाडांची कार अडकली असता त्यावेळी हा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यानंतर जितेंद्र आव्हाडांची कार वेगाने पुढे नेण्यात आली. या हल्ल्याची जबाबादारी स्वराज्य संघटनेने घेतली आहे.

मुंबईत आज जितेंद्र आव्हाडांची पत्रकार परिषद होती. ही पत्रकार परिषद संपल्यानंतर आव्हाड त्यांच्या ठाण्यातील निवासस्थानी निघाले होते. त्यावेळी वाटेत वाहतूक कोंडीत आव्हाडांची कार अडकली असता त्यावेळी हा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यानंतर जितेंद्र आव्हाडांची कार वेगाने पुढे नेण्यात आली. या हल्ल्याची जबाबादारी स्वराज्य संघटनेने घेतली आहे.

## ठाकरे - फडणवीस यांच्यातला वाद मिटला नाही तर पुढचा मुख्यमंत्री मी - रामदास आठवले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ पुणे**

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या उद्धव ठाकरे वर्सेस देवेंद्र फडणवीस वाद सुरू आहे. राजकारणात विरोधक देखील असतात. माझी दोघांनाही विनंती आहे. दोघांनाही राजकारणात राहिलं पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांना फोडले असं नाहीये. मला वाटतंय राजकारणात दोघेही राहतील. उद्धव ठाकरेंनी मनातील चीड काढून टाकावी. पुन्हा एकदा दोघांची मैत्री व्हावी अशी आमची इच्छा आहे. मात्र यांच्यातील वाद मिटला नाही तर पुढचा मुख्यमंत्री मी आहे असे विधान केंद्रीय समजकल्याण मंत्री रामदास आठवले व्यक्त केले.



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त सारसबाग परिसरात मातंग समाज समन्वय समिती पुणे यांच्यातर्फे अभिवादन सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी केंद्रीय समाजकल्याण मंत्री आठवले यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले यावेळी समाज माध्यमांशी बोलताना आपले मत व्यक्त केले.

**अण्णा भाऊ साठे यांना 'भारतरत्न' ची मागणी**

लोकशाही अण्णा भाऊ साठे यांना 'भारतरत्न' पुरस्कार देण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. अण्णाभाऊंना भारतरत्न मिळण्यासाठी मी स्वतः पाठपुरावा करणार असून, लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा करणार आहे.

## महाराष्ट्रात केवळ ५५ ते ६५ जागा जिंकू शकेल भाजपा? अंतर्गत सर्व्हेनं पक्षाचं टेन्शन वाढवलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

लोकसभा निवडणुकीनंतर आता महाराष्ट्रातील सर्वच पक्ष विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. लोकसभा निवडणुकीचा विचार करता, या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात भाजपाच्या मोठ्या प्रमाणावर जागा कमी झाल्या. यामुळे, यावेळच्या विधानसभा निवडणुकीतही




भाजपाला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, यासंदर्भात अद्याप कुठलेही अधिकृत भाष्य करण्यात आलेले नाही.

न्यू इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भाजपा आपल्या कामगिरीसंदर्भात चिंतित दिसत आहे. भाजपाने केलेल्या अंतर्गत सर्व्हेमध्ये २८८ विधानसभा जागांपैकी पक्षाला केवळ ५५ ते ६५ जागाच मिळू शकतात, असे दिसत आहे. यापूर्वी भाजपाला २०१४ मध्ये १२२ तर २०१९ मध्ये १०५ जागा मिळाल्या होत्या.

## पूजा खेडकर यांचा अटकपूर्व जामीन न्यायालयाने फेटाळला; कोणत्याही क्षणी अटकेची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१पुणे**

माजी आयएस अधिकारी पूजा खेडकरला मोठा झटका बसला असून, पटियाला हाऊस कोर्टाने तिची अटकपूर्व जामीन याचिका फेटाळली. बनावट प्रमाणपत्रांचा वापर करून नियमबाह्य आरक्षणाचा लाभ मिळवला आहे का, याची चौकशी करण्याचे



निर्देश न्यायालयाने यूपीएससी ला दिले आहेत. याशिवाय, यूपीएससी मधील कोणी-कोणी पूजा खेडकरला तिच्या चुकीच्या गोष्टी करण्यास मदत केली, हे तपासण्याचे निर्देशही न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिले आहेत.


आलिशान कार आणि त्यावरील अंबर दिवा यामुळे वादात सापडलेल्या प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरबाबत युपीएससीने कालच महत्त्वाचा निर्णय दिला. पूजा खेडकरला युपीएससीने दोषी ठरवले आणि तिची उमेदवारीही रद्द करुन टाकली. महाराष्ट्र केडरची प्रशिक्षणार्थी IAS अधिकारी पूजा खेडकर हिने बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचे तपासात समोर आले. पूजा खेडकरने सादर केलेल्या सर्व प्रमाणपत्रांची तपासणी झाली. त्यानंतर तिच्यावर कारवाई करण्यात आली.

## मथुरा जन्मभूमी प्रकरणी मुस्लिम पक्षाला मोठा धक्का, उच्च न्यायालयाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मथुरा**

मथुरेतील श्रीकृष्ण जन्मभूमी-शाही ईदगाह मशीद वाद प्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. आदेश ७ नियम ११ वर आक्षेप घेणारा मुस्लिम पक्षाचा अर्ज उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. आता या प्रकरणाची सुनावणी लवकरच सुरू होणार आहे. या प्रकरणी दाखल झालेल्या १८ अर्जांची एकत्रित सुनावणी करता येईल की नाही, हे न्यायालयाला ठरवायचे होते. न्यायमूर्ती मयंक कुमार जैन यांच्या एकल खंडपीठाने हा निर्णय दिला आहे.

मथुरेच्या श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरणात हिंदू बाजूने १८ याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. यामध्ये त्यांनी शाही ईदगाह



मशिदीची जमीन हिंदूंची असल्याचे वर्णन केले आहे. याठिकाणी पूजेचा अधिकार द्यावा, अशी मागणी हिंदूकडून होत होती. वेगवेगळ्या याचिकांवर एकत्रित सुनावणी घेऊन न्यायालयाला निकाल द्यावा लागला. मुस्लिम बाजूने ऑर्डर ७, नियम ११ नुसार या याचिकांच्या देखरेखीवर प्रश्न उपस्थित केला आणि त्या फेटाळण्याचे आवाहन केले. मुस्लिम बाजूने प्रार्थना स्थळ कायदा, वक्फ कायदा, मर्यादा कायदा आणि विशिष्ट ताबा सुटका कायदा यांचा उल्लेख केला आणि हिंदू बाजूच्या याचिका फेटाळण्यासाठी युक्तिवाद केला.उच्च न्यायालयाच्या या आदेशानंतर आता अयोध्येच्या धर्तीवर मथुरा श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरणाचीही सुनावणी होणार आहे. या प्रकरणी हिंदू पक्षाने अयोध्येतील राम मंदिर आणि वाराणसीतील काशी विश्वनाथ मंदिराच्या धर्तीवर मथुरा प्रकरणातील वादग्रस्त जागेचे सर्वेक्षण करण्याचीही मागणी केली आहे. दाखल केलेल्या १८ याचिकांपैकी अलाहाबाद उच्च न्यायालय एकाच वेळी १५ याचिकांवर सुनावणी सुरू आहे.

## संपादकीय ......

# अण्णा भाऊंच्या साहित्यातील जीवनमूल्ये

*साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव येथे झाला. आयुष्यातील बहुतांशकाळ त्यांना पराकोटीच्या दारिद्र्याला तोंड द्यावे लागले. शाळेचा केवळ दीड दिवस सोडला, तर शिक्षणापासून ते दूर गेले. त्यामुळे त्यांची जीवनशैली उन्मुक्त बनली. डोंगरदर्या, नदी-ओहोळ, माळ अशा लौकिकाशी ते जोडले गेले. त्यांच्या आजच्या जयंतीनिमित्त..!*

*जीवनातील अनुभवाच्या संचितावर आणि वारणा खोर्यात, वाटेगाव टापूत होणार्या लोककलांवर त्यांचा मन:पिंड पोसला. त्यांच्यातला कलावंत विकसित झाला. क्रांतिसिंह नाना पाटील आणि बर्डे गुरुजींच्या क्रांतित्वाने भारून जाऊन अण्णा भाऊंनी भूमिगत लढ्यात सहभाग दर्शवला. पुढे मुंबईनगरी त्यांना ऊर्जादायी ठरली. कम्युनिस्ट विचारांची ओढ निर्माण झाली. आधीच गोष्टीवेल्हाळ स्वभाव; तो लेखणीत उतरला. त्यांच्यातला बहुमुखी प्रतिभावंत लौकिक पावला. पोवाडे, लोकनाट्य, नाटक, प्रवासवर्णन, कथा आणि कादंबरी लेखन केले. वारणा ते वोल्गा असा विचारांचा प्रदेश व्यापणारे त्यांचे साहित्य जवळजवळ जगभरातील २७ भाषांत भाषांतरित झाले आहे. अण्णा भाऊ ज्या काळात लिहायला लागले, त्यावेळचा साहित्यव्यवहार हा मांडीवरच्या तिळांत आणि गालावरच्या खुणांत अर्थ शोधत होता. आवळ्या-भोपळ्याची मोट बांधत होता. स्वातंत्र्याची पहाट झाली होती; परंतु सामान्यांच्या स्वातंत्र्याचे त्यांना वावडे होते. नवभांडवलदार वर्ग उदयास येत होता.*

*वर्ग-वर्ण संघर्षाचा धोका टळला नव्हता. सरंजामशाहीचा पीळ सुटला नव्हता. सामाजिक उलथापालथ होत होती. त्या काळात अण्णांनी लिहिले, ते जाणिवेने लिहिले. पुराणकथा सांगण्याऐवजी त्यांनी वर्तमान वास्तव रेखाटले. त्यामागे मानवी जीवनाविषयीची अपार करुणा होती. दलित, वंचित, शेतमजूर आणि स्त्री हा त्यांच्या आस्थेचा परीघ होता. त्यामागे सामाजिक भान होते म्हणून १९४९ मध्ये 'मशाल' या मासिकात 'माझी दिवाळी' ही पहिली कथा प्रसिद्ध झाली. अण्णांनी उदात्त जीवनमूल्ये चिरंतन वाहती राहावीत, हा विचार ठेवून लेखन केले. मानवाचे वर्तन स्वच्छ, तर व्यवहार स्पष्ट असावा याची शिकवण त्यांचे साहित्य देते. शोषणमुक्त, विषमतामुक्त समाजाचा ध्यास त्यांनी घेतला. जातजाणिवा नाकारल्या. त्यांची 'डोळे' ही कथा स्त्री अस्मितेचे दर्शन घडवते. 'मरीआईचा गाडा' अंधश्रद्धेला दूर सारते. औद्योगिकीकरणाचा फटका बसलेली 'चित्रा' ही स्त्री शील किती महत्त्वाचे आहे, हे सांगते. चारित्र्यासाठी लढणार्या स्त्रिया सामर्थ्यवान होत्या. 'माकडीचा माळ' ही कादंबरी भटक्या-विमुक्तांची वेदना मांडते. 'चिखलातील कमळ' ही देवदासी प्रथेवर आधारित आहे. 'आवडी'तला विचार प्रागतिक ठरतो. 'सापळा' ही कथा धर्मचिकित्सा करते. सामाजिक अभिसरणाला पूरक ठरते. 'तीन भाकरी' विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन जागा करते.*

*'जिवंत काडतूस', 'मास्तर' या कादंबर्या क्रांतिकाळातले जिकिरीचे प्रश्न मांडतात. 'फकिरा', 'वारणेचा वाघ' कलिकाळाच्या टाळूवर नाचण्याचे सामर्थ्य देतात. 'शेटजीचं इलेक्शन'मधून शेतकरी-शेतमजुरांचा प्रश्न पुढे येतो. त्यांची कथनपद्धत ही देशी बाण्याची होती. त्याद्वारे यातनांचा शोध घेतला. जीवनव्यवहार, लोकव्यवहार समजून सांगितला. स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, मांगल्याचा अट्टाहास धरला. स्वाभिमान जागृत केला. चारित्र्य सुधारले. दुबळ्याला कृतिप्रवण केले. सृष्टीची विलोभनीयता शोधली म्हणून 'खरी कला काळजाशी भिडून बोलते' असे ते म्हणत. त्यांना सूर्योदय-सूर्यास्ताचे आकर्षण होते म्हणून त्यांनी साचलेपण नाकारले. 'लेखक हा सदैव जनतेबरोबर असावा लागतो कारण जो कलावंत जनतेसोबत असतो, त्याच्याबरोबर जनता असते. जनतेकडे पाठ फिरविणार्याकडे जनताही पाठ फिरवीत असते. जगातील सर्व श्रेष्ठ कलावंतांनी वायय हा तिसरा डोळा मानला आहे आणि तो डोळा सदैव पुढे व जनतेबरोबर असणे जरूर आहे. तसेच शब्दांना नुसता आकार देणे सोपे असते. त्या आकाराला आत्मा देणे त्याहून अवघड आहे. तेही काही लेखकांना सहज साधून जाते; पण त्या आत्म्यामागची इतिहास परंपरा शोधणे आणि तिचा अर्थ लावणे फार अवघड आहे.' तसेच 'हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलिताच्या तळहातावर तरलेली आहे,' असे अण्णांनी म्हटले आहे. खडकातून झिरपणार्या पाझराप्रमाणे असणारे जीवन त्यांनी जवळून पाहिले. त्यांचे साहित्य ही मराठीजनांसाठी शिदोरी आहे.*

# सूर्यफुल तेलबियाचे उत्पादन वाढविण्यासाठी हे आहेत सोपे सहा उपाय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ अमरावती–** तेलाचे उत्पादन वाढवून स्वयंपूर्ण होण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय तेलबिया मिशन हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यामध्ये उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा आहे.शेतकर्यांच्या शेतावर राबविलेल्या आद्यरेषीय प्रात्यक्षिकावरून असे दिसून आले की, सुधारित तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे पारंपारिक पद्धतीपेक्षा १८ ते ४५ टक्के अधिक उत्पादन मिळते आहे म्हणून त्या क्षेत्रात अधिक उत्पादन व अधिक फायदा मिळविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यंत महत्वाचे आहे.




**१) खत मात्रा–** सूर्यफूल पीक रासायनिक खतास चांगला प्रतिसाद देते. सूर्यफुलच्या भरघोस उत्पादनासाठी कोरडवाहू पिकास ५० किलो नत्र (१०८ किलो युरिया), २५ किलो स्फुरद (१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व २५ किलो पालाश (४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी द्यावे. सर्व खते पेरणीच्या वेळेस दोन चाड्याच्या पाभरीने पेरून द्यावीत. बागायती सूर्यफूल पिकास प्रति हेक्टरी ६० किलो नत्र (१२९ किलो युरिया), ३० किलो स्फुरद (१८८ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ३० किलो पालाश (५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी द्यावे. नत्र खत दोन हफ्त्यात विभागून द्यावे. नत्राची अर्धी मात्रा ३० किलो पेरताना द्यावी व उरलेले ३० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसानी द्यावे.

**२) आंतरपीक–** आंतरपीक पद्धतीमध्ये दोन पिके वेगवेगळ्या कालावधीत तयार होणारी असतात. एका पिकाचे नुकसान झाले तरी दूसऱ्या पिकापासून काहीतरी उत्पादन मिळते म्हणून सलग पीक लागवडीपेक्षा आंतरपीक फायदेशीर आहे. आंतरपीक किंवा मिश्रपिकांमुळे शेतकऱ्यांच्या विविध गरजा उदाहरणार्थ नगदी, तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य, जनावरांसाठी चारा, जळणाकरिता इंधन इत्यादी गरजा भागविल्या जातात.

**३) विरळणी व आंतर मशागत–** सूर्यफूल पिकाची चांगली वाढ होण्यासाठी तसेच अन्नद्रव्याचा कार्यक्षम वापर होण्यासाठी विरळणी करून झाडाची योग्य संख्या ठेवणे महत्वाचे आहे. पेरणीनंतर १५ ते २० दिवसाच्या आत विरळणी करावी. विरळणी करताना ३० से.मी. अंतरावर एक जोमदार रोप ठेऊन विरळणी करावी तणांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पेंडीमेथिलीन (३० टक्के ईसी) हे तणनाशक २५ ते ३० मि.लि. प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे पेरणीनंतर परंतू पीक उगवण्यापूर्वी फवारणी घ्यावी. गरजेनुसार पिकाची खुरपण करून शेत स्वच्छ ठेवावे.

**४) संरक्षित पाणी देणे–** सूर्यफुलापासून अधिक उत्पादन मिळण्यासाठी पाणी उपलब्ध असल्यास गरजेनुसार पिकाच्या वाढीच्या संवेदनशील अवस्थेत संरक्षित पाणी द्यावे. सूर्यफूल पिकाच्या रोप अवस्था, फुलकळी अवस्था, फुलोरा आणि दाणे भरण्याची अवस्था या संवेदनशील अवस्था असून या अवस्थेत पिकास गरजेनुसार पाणी द्यावे. फुलोरा अवस्था आणि दाणे भरण्याची अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास त्याचा दाणे भरण्यावर अनिष्ट परिणाम होऊन पर्यायाने उत्पादन घटते. पीक फुलोरा अवस्थेत असताना तुषार सिंचन करू नये.

**५) परागीभवन–** सूर्यफूल हे पीक परपरागसिंचित असल्यामुळे दाणे भरण्यासाठी कृत्रिम परागीभवन घडवून आणणे महत्वाचे आहे. त्यासाठी शक्य असल्यास तळ हाताला तलम कापड गुंडाळून रोज सकाळी ७ ते ११ या वेळेत एक दिवसाआड असे ३ ते ४ वेळा फुलावरून हलकासा हात फिरवावा किंवा परागीभवनासाठी प्रति हेक्टरी ४ ते ५ मधमाशाच्या पेट्या ठेवाव्यात. मधमाशा मध गोळा करताना फुलावर बसतात त्यामुळे त्यांच्या शरिराला चिकटलेल्या परागकणाद्वारे परागीभवन घडून येते. पर्यायाने उत्पादनात वाढ होते.

**६) बोरॉनची फवारणी–** सूर्यफुलाचे पीक फुल उमलण्याच्या अवस्थेत असताना २० ग्रॅम बोरॅक्स प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. त्यामुळे दाणे भरण्याचे प्रमाण वाढून उत्पादनात वाढ होते.

# सोयाबीनवरील पिवळा मोझॅक रोगासाठी करा हे सोपे उपाय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ अमरावती –** गेल्या वर्षी मराठवाड्यातील बऱ्याच भागात सोयाबीन ङ्गूलशरप ीरळल ींळीी पिकावर पिवळा मोझॅक म्हणजेच केवडा रोगाचा प्रादुर्भाव झाला होता, या रोगाचा जास्त प्रादुर्भाव झाल्यामुळे काही शेतकऱ्यांना संपूर्ण पिकचं उपटून टाकावे लागले होते. हा रोग मुंगबीन यलो मोझॅक या विषाणुंमुळे होतो. कडधान्य आणि तणे ही या रोगाची पर्यायी यजमान पिके आहेत. यावर्षीही हंगामाच्या सुरवातीलाच काही भागात सोयाबीनवर पिवळा मोझॅक (केवडा) या रोगाचा प्रादुर्भाव सुरू झालेला दिसून येतो आहे. या रोगामुळे सोयाबीनमध्ये १५ ते ७५ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते.




**रोगाची लक्षणे**

१) सोयाबीनच्या पानाच्या मुख्य शिरीपाशी विखुरलेल्या अवस्थेत पिवळ्या रंगाचे चट्टे अथवा अनियमित पट्टे दिसतात त्यानंतर पाने जसे जसे परिपक्व होत जातात तसे तसे त्यावर गंजलेले तांबूस रंगाचे चट्टे दिसतात.

२) काही वेळा जास्त प्रादुर्भाव असल्यास पाने अरुंद होतात व मुरगळतात. लहान अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास पूर्ण झाड पिवळे पडते. अशा झाडांना कालांतराने फुले आणि शेंगा कमी लागतात किंवा त्यातील दाण्यांचा आकार लहान राहतो किंवा संपूर्ण शेंगा दाणे विरहीत राहून पोचट होतात आणि पर्यायाने उत्पन्नात मोठी घट येते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

३) दाण्यांमधील तेलाचे प्रमाण घटते तर प्रथिनांच्या प्रमाणात वाढ होते.

४) हा विषाणू पानातील रसामार्फत पसरतो आणि हा प्रसार मुख्यत: पांढऱ्या माशी या रसशोषक किडीद्वारे केला जातो. त्यामुळे वेळीच या रोगाला ओळखून तसेच पांढऱ्या माशीचे नियंत्रण करून या रोगाचे व्यवस्थापन करावे.

सोयाबीनवरील पांढरी माशी आणि पिवळ्या मोझॅक विषाणूचे एकात्मिक व्यवस्थापन

काही सोयाबीन पिकाचे वाण या रोगास लवकर आणि जास्त प्रमाणात बळी पडतात. त्यामुळे या रोगास बळी पडणाऱ्या वाणाची लागवड न करता आपल्या भागात विद्यापीठाद्वारे शिफारस केलेल्या सोयाबीन वाणांचीच लागवड करावी.

लागवडीनंतर वेळोवेळी पिकाचे कीड व रोगांसाठी निरीक्षण आणि सर्वेक्षण करावे. मोझॅक (केवडा) झालेली प्रादुर्भावग्रस्त पाने, झाडे दिसून येताच ती वेळोवेळी समूळ काढून नष्ट करावीत जेणेकरून निरोगी झाडांवर होणारा किडीचा व रोगांचा प्रसार कमी करणे शक्य होईल.

रोगाच्या प्रसारास कारणीभूत असलेल्या पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी पिकावर रोगाची लक्षणे दिसताच किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून थायमिथोक्झाम १२.६ टक्के अधिक लॅम्बडा सिहॅलोथ्रीन ९.६ टक्के झेडसी ५० मिली यापैकी एका किटकनाशकाची फवारणी प्रति एकर याप्रमाणात करावी.

पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पिकामध्ये प्रति एकरी १० पिवळे चिकट सापळे लावावेत.

फवारणीसाठी कीटकनाशकाची व पाण्याची शिफारस केलेली मात्राच वापरावी.

नत्रयुक्त खताचा अतिरिक्त वापर टाळून शिफारसीनुसारच करावा.

मूग, उडीद यासारख्या पर्यायी खाद्य वनस्पतीवरून पिवळा मोझॅक रोगाचा प्रसार होण्यापासून रोखण्यासाठी अशा पिकावरील पांढरी माशीचे व्यवस्थापन करावे.कमीत कमी पहिले ४५ दिवस पीक तणमुक्त ठेवावे.पावसाचा ताण पडल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे.बिगर हंगामी सोयाबीनची लागवड शक्यतो टाळावी जेणेकरून किडीच्या जीवनक्रमात खंड पडतो आणि पुढील हंगामात पर्यायाने किडींचा प्रादुर्भाव कमी राहतो.पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी आवश्यकता वाटल्यास दहा दिवसानंतर परत एकदा कीटकनाशकांची फवारणी करावी.

**डॉ. जी. डी. गडदे,**
डॉ. डी. डी. पटाईत आणि श्री.
**एम. बी. मांडगे**
कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र,
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी




# पावसाळ्यातही फ्रिजमधलं थंड पाणी घटाघट पिताय? तज्ज्ञ सांगतात, गार पाणी पिण्याने काय होतं...

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ अमरावती –** आपल्या पैकी बऱ्याचजणांना वर्षाचे बाराही महिने फ्रिजमधील थंड पाणी पिण्याची सवय असते. ऋतू कोणताही असो तहान लागली की फ्रिजमधील थंड पाणीच पिणे पसंत करतात. कडाक्याच्या उन्हाळ्यात एकवेळ असे थंड पाणी पिणे सहाजिक आहे, परंतु हिवाळा आणि पावसाळ्यात असे थंड पाणी पिणे शरीरासाठी हानिकारक ठरु शकते. पाणी पिऊन आपण शरीराला हायड्रेट आणि निरोगी ठेवू शकतो. पावसाळ्याच्या दिवसातही शरीर हायड्रेट ठेवणे गरजेचे असते.



दिवसभरात पुरेशा प्रमाणात पाणी प्यायल्याने मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारते. पावसाळ्याच्या दिवसातही चिकट आणि दमट हवामानामुळे थंड पाणी प्यावेसे वाटते. त्यामुळे काहीजण फ्रिजमधील थंड पाण्याची बाटली काढून ते गार पाणी पितात. परंतु असे केल्याने तुमच्या आरोग्याला हानी पोहोचू शकते. फ्रिजचे थंड पाणी प्यायल्यास आपण आजारी पडू शकतो. फ्रिजमधल पाणी पिणं कोणत्याही ऋतूत आरोग्यासाठी चांगलं नसलं तरी विशेषतः पावसाळ्याच्या दिवसात फ्रिजमधील थंड पाणी पिणं आरोग्यासाठी हानिकारक ठरु शकत. दिल्लीच्या होली फॅमिली हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ सना गिल यांनी पावसाळ्यात फ्रिजमधील थंड पाणी पिण्याने काय नुकसान होते याबद्दल अधिक माहिती दिली आहे. पावसाळ्यात फ्रिजमधील थंड पाणी न पिता नेमके कोणत्या प्रकारचे पाणी प्यावे हे समजून घेऊयात

पावसाळ्यात थंड पाणी पिण्याचे दुष्परिणाम :-

१. पावसाळ्यात थंड पाणी पिण्यामुळे घशातील टिश्यू सुकून त्या आकुंचित होऊ शकतात, यामुळे घसा खवखवणे किंवा सर्दी यांसारखे छोटे - मोठे आजार होऊ शकतात.

२. थंड पाणी प्यायल्याने पचनक्रिया मंदावते, कारण थंड पाण्यामुळे पचन संस्थेवर परिणाम होतो आणि अन्ननलिकेतील रक्ताभिसरण कमी होते.

३. पावसाळ्यात बाहेरच्या तापमानाची आणि आर्द्रतेची अस्थिरता वाढते आणि त्यामुळे शरीराच्या तापमानावरही परिणाम होतो.

४. थंड पाणी प्यायल्याने शरीराचे तापमान अचानक कमी होऊ शकते, ज्यामुळे सर्दी आणि खोकल्याचा धोका वाढतो.

५. थंड पाणी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करू शकते, ज्यामुळे संसर्ग होण्याची शक्यता वाढते.

६. थंड पाणी प्यायल्याने वारंवार तहान लागते कारण त्यामुळे शरीराचे तापमान अस्थिर होते.

# राज्यातील अनेक वीज निर्मिती संच बंद, विजेची मागणी २० हजार मेगावॅटहून कमी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१नागपूर : –** राज्यातील बऱ्याच भागात पावसाचा जोर कायम असल्याने नोंदवली गेली. त्यामुळे महानिर्मितीसह इतर काही खासगी कंपन्यांना वीजनिर्मिती बंद करावी लागली. राज्यातील बहुतांश भागात पाऊस असल्याने वातानुकूलित यंत्र, कुलर, पंखे, कृषी पंपासह विद्युत उपकरणांचा वापर कमी झाला आहे. ३० जुलैच्या दुपारी १.३० वाजता राज्यात विजेची मागणी १९ हजार ८३२ मेगावॅटपर्यंत खाली आली. त्यापैकी ३ हजार २५२ मेगावॅट मागणी मुंबईची तर इतर मागणी राज्यभरातील होती. एकूण मागणीपैकी १३ हजार २६८ मेगावॅट वीजनिर्मिती राज्यात होत होती. राज्यात सर्वाधिक ४ हजार ६७१ मेगावॅट वीजनिर्मिती महानिर्मिती कडून झाली. त्यात औष्णिक विद्युत प्रकल्पातून ४ हजार २५१ मेगावॅट, उरण गॅस प्रकल्पातून ८६ मेगावॅट, जलविद्युत प्रकल्पातून २६८ मेगावॅट, सौर ऊर्जाप्रकल्पातून ६३ मेगावॅट वीजनिर्मिती करण्यात आली. खासगी प्रकल्पांपैकी अदानीकडून १ हजार ४५२ मेगावॅट, जिंदलकडून ७४६ मेगावॅट, आयडियलकडून १७४ मेगावॅट, रतन इंडियाकडून ४६४ मेगावॅट, एसडब्ल्यूपीजीएलकडून ३४७ मेगावॅट वीजनिर्मिती झाली. केंद्राच्या वाट्यातूनही राज्याला ६ हजार ७११ मेगावॅट वीज मिळाली. दरम्यान, या वृत्ताला महावितरण व महानिर्मिती च्या अधिकाऱ्यांनी नाव न टाकण्या च्या अटीवर दुजोरा दिला. गरजे नुसार वीज उपलब्ध करण्यासाठी कंपन्या सज्ज असल्याचा दावाही त्यांनी केला.

# केदारनाथमध्ये ढगफुटी, पदयात्रेच्या मार्गावर भूस्खलन, २०० यात्रेकरू अडकले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१केदारनाथ–**

मुसळधार पावसामुळे केरळमधील अनेक भागांमध्ये पूर आलेला असतानाच आता उत्तर भारतातही तशीच स्थिती निर्माण झाली आहे. अतिवृष्टीमुळे दिल्लीच्या अनेक भागांमध्ये पाणी साचलं आहे. पाठोपाठ उत्तराखंडमध्येही अतिवृष्टी सुरू झाली आहे. केदारनाथला जाणाऱ्या मार्गावर लिनचोलीजवळ ढगफुटीची घटना समोर आली आहे. त्यामुळे काहीच क्षणात मंदाकिनी नदीची जलपातळी वाढली आहे. ढग फुटल्याने ओढे, नाले तुडुंब भरून वाहू लागले आहेत. अनेक भागांमध्ये पाणी साचलं असलं तरी अद्याप कोणत्याही जीवितहानीचं वृत्त समोर आलेलं नाही. मात्र, केदारनाथला जाणारी पदयात्रा विस्कळीत झाली आहे. पदयात्रेच्या मार्गावरच ढग फुटल्याने ५० ते २०० तीर्थयात्रेकरू अडकल्याचं वृत्त नुकतंच समोर आलं आहे.

या पदयात्रेतील मार्ग असलेल्या परिसरात भूस्खलन होऊन रस्त्याचा ३० मीटरचा भाग दुर्घटनाग्रस्त झाला आहे. केदारनाथला जाणारा पायी मार्ग दुर्घटनाग्रस्त झाल्याने या मार्गावरील दळणवळण पूर्णपणे ठप्प झालं आहे. स्थानिक प्रशासनाने मदतीसाठी एक बचाव पथक घटनास्थळी पाठवलं आहे.



केदारनाथमध्ये रात्रभर चालू असलेला मुसळधार पाऊस, लिनचोली व महाबली भागात झालेल्या भूस्खलनानंतर मंदाकिनी नदीपात्रात मोठे दगड पडल्याने नदी आता एखाद्या झऱ्याएवढी झाली आहे. गौरकुंडमधील गरम पाण्याचं कुंड वाहून गेलं आहे. मध्यरात्री गौरीकुंड व सोनप्रयाग परिसरातील लोक आरडाओरड करत धावत सुटल्याचं काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं.जिल्हा न्यायदंडाधिकारी सौरभ गहरवार यांच्या आदेशानुसार केदारनाथ यात्रा थांबवण्यात आली आहे. यात्रेकरूंना हेलिपॅड व इतर सुरक्षित स्थळी नेण्यात आलं आहे. एसडीआरएफच्या जवानांनी मंदाकिनी नदीची मोहीम सांभाळली आहे. नदीलगत राहणाऱ्या लोकांना सुरक्षित स्थळी हालवण्यात आलं आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


## जागतिक व्याघ्र दिन; मेळघाट व्याघ्र प्रकल्पात उत्साहात साजरा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती,–** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सेमाडोह पर्यटन संकुल येथे दि. २९ जुलै रोजी जागतिक व्याघ्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आमदार राजकुमार पटेल, मुख्य संरक्षक (प्रादेशिक) जयोती बॅनर्जी, सिपना वन्यजीव विभाग परतवाडाचे उपवनसंरक्षक दिव्यभारती, अकोट वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक जय कुमारन, मेळघाट प्रादेशिक परतवाडा उपवनसंरक्षक अग्रिम सैनी, विभागीय वन अधिकारी(संसोधन व वन्यजीव मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे मनोजकुमार खैरनार, विभागीय वन अधिकारी यशवंत बहाळे आदि उपस्थित होते.जागतिक व्याघ्र दिनानिमित्य मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वने वन्यजीवाचे संरक्षण, अधिवास विकास व निसर्ग पर्यटनात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. डॉ. जयंत वडकर यांनी भारतातील व्याघ्र संवर्धनाबाबत तसेच डॉ. सावन देशमुख यांनी मानव व वन्यजीव संघर्ष या विषयावर सादरीकरानाद्वारे उपाययोजना आणि मार्गदर्शन केले. मेळघाट स्कील सेंटर, परतवाडा येथील विद्यार्थ्यांनी गदली या आदिवासी नृत्याद्वारे मान्यवरांचे स्वागत केले.मेळघाट व्याघ्र प्रकल्पास वेळोवेळी सहकार्य करणाऱ्या जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक डॉ. सावन देशमुख व डॉ. जयंत वडतकर तसेच वेक्स संस्थेचे डॉ. गजानन वाघ, अरंन्यम संस्थेचे सर्वेश मराठे, ऑर्गनायझेशन फॉर कुलाचे राकेश महल्ले व एसएफटीएफ संस्थेचे अल्केश ठाकरे यांचा देखील सन्मान करण्यात आला. मेळघाट व्याघ्र प्रकल्प कार्यालय व व्याघ्र प्रकल्पातील सर्व वन परीक्षेत्रात व्याघ्र दिनाच्या निमित्याने शालेय विद्यार्थ्यांकरिता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद शासकीय कन्या शाळा ऑचिड इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांना वने व वन्यजीव संरक्षण तसेच वाघांचे महत्व यावर संगणकीय सादरीकरनाद्वारे माहिती देण्यात आली. कार्यक्रम यशस्वीपणे वनपरिक्षेत्र अधिकारी योगेश तापस, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप भड, संकुल प्रभारी सेमाडोह संकूल प्रदीप तडखणकर, वनरक्षक वनिता खवास, वनरक्षक, आकाश सारडा, वनरक्षक, अशोक सोनोने, वनरक्षक कु. रेखा कोकरे, मनीष ढाकुलकर, उपजीविका तज्ज्ञ ज्ञानदीप तराळे, पर्यटन व्यवस्थापक स्वप्नील बांगडे, सामाजिक समन्वयक अतुल तिखे व अगस्ता संस्थेचे दीपक देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले.

## अचलपूर येथील फिनले मिल पुन्हा सुरू करण्यासाठी राज्य सरकार पुढाकार घेणार –उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ मुंबई,** अमरावती जिल्ह्यातील अचलपूर येथील फिनले मिल पुन्हा सुरू करण्यासाठी महाराष्ट्राचे वेगळे मॉडेल तयार करून तातडीने प्रस्ताव तयार करावा, राज्य सरकार यासाठी पुढाकार घेईल,असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली अचलपूर येथील फिनले मिल संदर्भात आढावा बैठक संपन्न झाली.

बैठकीला वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार रवी राणा, आमदार बच्चू कडू (ऑनलाइन) केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव रोहित कन्सल, सहसचिव प्राजक्ता लवंगारे,उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी,वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव सौरभविजय, वस्त्रोद्योग विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, फिनले मिल मधील कामगार व संबंधित अधिकारी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, फिनले मिल सुरू करण्यासाठी राज्य सरकार आर्थिक सहकार्य करायला तयार आहे. महाराष्ट्र शासनाच्या भागीदारीचा सहभागाचा घेऊन वेगळे मॉडेल विकसित करण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव तातडीने तयार करावा.

तसेच मिलमधील काही कामगारांना शंभर टक्के वेतन दिले जात नाही. ते पुढील महिन्यापासून सर्वांना शंभर टक्के वेतन सुरू करावे, आशा सूचनाही उपमुख्यमंत्र ीश्री.फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

अमरावती जिल्ह्यातील फिनले मिल सुरू होणे आवश्यक आहे. या मिलमुळे मोठ्या प्रमाणत रोजगार निर्मिती आणि वस्त्रोद्योगाला चालना मिळणार आहे. मिल सुरू करण्यासाठी केंद्र सरकारशी समनव्य करून ही मिल सुरू करण्यासाठी राज्य सरकार पुढाकार घेईल असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

बैठकीत वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी फिनले मिल सुरू करण्या येत असलेल्या अडचणी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि मिल कामगार यांची मागणी यासंदर्भात माहिती देऊन मिल सुरू करण्यासाठी वस्त्रोद्योग विभागाचा सहभाग याबाबत माहिती दिली.

## भारताचे माजी क्रिकेटपटू अंशुमन गायकवाड यांचं निधन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१मुंबई–** क्रिकेटच्या मैदानात परिस्थितीत कितीही विपरीत असली तरी हार न मानणारे भारताचे दिग्गज माजी क्रिकेटपटू–फलंदाज अंशुमन गायकवाड यांची कॅन्सरशी मात्र झुंज अपयशी ठरली. रक्ताच्या कर्करोगामुळे त्यांचं गुरुवारी रात्री निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. अंशुमन गायकवाड यांनी ४० कसोटी व १५ एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व केलं. त्याशिवाय अंशुमन गायकवाड यांनी भारतीय संघाचे प्रशिक्षक व राष्ट्रीय निवड समिती सदस्य म्हणूनही भूमिका बजावली.अंशुमन गायकवाड यांच्यावर लंडनमध्ये गेल्या काही काळापासून रक्ताच्या कर्करोगासाठी उपचार चालू होते. लंडनच्या किंग्ज कॉलेजमध्ये त्यांनी उपचार घेतले. गेल्याच महिन्यात ते भारतात परत आले होते. त्यांच्यावरील उपचारांसाठी बीसीसीआयने नुकतीच एक कोटी रुपयांची आर्थिक मदत केली होती. १९८३ सालच्या भारतीय विश्वचषक विजेत्या संघातील खेळाडूंनीही उपचारांसाठी त्यांना आर्थिक मदत केली होती.अंशुमन गायकवाड यांच्या निधनामुळे क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली आहे. जलदगती गोलंदाजांसमोर पाय रोवून उभे राहात अंशुमन गायकवाड यांनी जगभरातल्या अनेक तेजतर्रार गोलंदाजांचा यशस्वीपणे सामना केला. यामध्ये त्यांनी थेट अंगावर अनेक गोलंदाजांचे वेगवान चंडू झेलले. यामुळे त्यांना अनेकदा जखमाही झाल्या. पण त्यांचा अभेद्य बचाव भेदणं वेगवान अनेक दिग्गज गोलंदाजांसाठी महाकठीण कर्म ठरलं. गायकवाड यांच्या निधनावर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून शोक व्यक्त केला आहे. क्रिकेटसाठी त्यांनी दिलेल्या योगदानासाठी गायकवाड कायम स्मरणात राहतील. त्यांना क्रिकेट ची दैवी देणगी होती. ते एक अतुलनीय प्रशिक्षक होते. त्यांच्या निधनामुळे मना मनस्वी दु:ख झालं आहे. त्यांचे कुटुंबीय व आप्तस्वकी यांच्या दु:खात मी सहभागी आहे. ओम शांती, अशी पोस्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे.

## स्वातंत्र्य दिनाचा मुख्य ध्वजारोहण सोहळा

### पूर्वतयारी आढावा कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समन्वयाने काम करावे– निवासी उपजिल्हाधिकारी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** भारतीय स्वातंत्र्याचा ७७ वा वर्धापन दिनाचा मुख्य शासकीय समारंभ दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९.०५ वाजता विभागीय आयुक्त कार्यालय येथे होणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी आज येथे दिले.भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिनाचा मुख्य ध्वजारोहण सोहळाच्या पूर्वतयारी संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त माया केदार, जिल्हा क्रीडा अधिकार गणेश जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे तुषार काळे, मनपाचे डॉ. अजय जाधव, पोलीस निरिक्षक प्रविण बांगडे, श्रीधर गुलमुंढरे, भुषण पुसतकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री. भटकर म्हणाले की, नागरिकांना मुख्य शासकीय समारंभात सहभागी होता यावे यासाठी दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ८.३५ ते ९.३५ यावेळेत इतर कार्यालय, संस्थांनी ध्वजारोहण किंवा शासकीय अथवा निमशासकीय समारंभ आयोजित करु नये. असे समारंभ सकाळी ८.३५ च्या पूर्वी किंवा सकाळी ९.३५ च्या नंतर आयोजित करावे. कार्यक्रमात राष्ट्रगीतानंतर ‘जय जय महाराष्ट्र माझा’ हे राष्ट्रगीत बँड पथकाव्दारे सादर करण्यात येईल.

महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संयुक्तपणे विभागीय आयुक्त कार्यालयासमोरील साफसफाई आपल्या विभागामार्फत करावी. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, लि. अमरावती यांनी कार्यक्रमस्थळी वीज पुरवठा खंडीत होणार नाही, याची दक्षता घ्यावी. कार्यक्रमाच्यावेळी ध्वजाला मानवंदना देण्यासाठी पोलीस पथक, बँड पथक तसेच ध्वजारोहणाची रंगीत तालीम घ्यावी. राष्ट्रध्वज सूर्यास्तास उतरवला जाईल, याची दक्षता समितीने घ्यावी. तसेच कार्यक्रमस्थळी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलीस विभागाने व्यवस्था करावी.स्वातंत्र्यदिनाचा ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपल्यानंतर सर्व विभागीय कार्यालय, शिक्षण संस्था, महाविद्यालय, शाळा तसेच सेवाभावी संस्था, क्रीडा मंडळ यांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम करावा. त्यासाठी लागणारी रोपे सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती यांनी पुरवावी. तसेच अतिथी व उपस्थितांची बैठक व्यवस्था, आवश्यक स्वयंसेवक, ध्वनीयंत्रणा आदी व्यवस्था काटेकोर असावी, अशा सूचना श्री. भटकर यांनी यावेळी दिल्या.

## लोकशाहीचा चौथा स्तंभ असुरक्षित : शैलेश पांडे




### लोकमान्य टिळक व्याख्यानमाला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती,** संसदेतील लोकप्रतिनिधींना कायद्याचे संरक्षण व आर्थिकदृष्ट्या इतर मोठ्या सोयी–सवलीत आहेत. कार्यपालिकेतील नौकर वर्गालाही या सर्व सोयी व सुरक्षा आहेत आणि न्यायपालिकेतील काम करणार्यांना तर प्रचंड संरक्षण आहे; मात्र, लोकशाहीचा जो चौथा व महत्त्वाचा मानला गेलेला पत्रकारितेचा स्तंभ आहे, तो आजही असुरक्षित आहे, असे स्पष्ट प्रतिपादन नागपूरचे डिजिटल तरुण भारतचे संपादक शैलेश पांडे यांनी केले. स्थानिक अमरावती नगरवाचनालयात आयोजित लोकमान्य टिळक व्याख्यान मालेचे सहावे पुष्प गुंफताना ते बोलत होते.‘चौथा स्तंभ : भ्रम आणि वास्तव’ या विषयावर बोलताना शैलेश पांडे पुढे म्हणाले, इंग्लडच्या संसदेत एडमंड बर्ग याने चौथ्या स्तंभाला तिन्ही स्तंभापेक्षा जास्त महत्त्व असल्याचे उद्गार काढले होते. मात्र, आज भारतातील वृत्तपत्र माध्यम सुरक्षित नाही. कायद्याचे संरक्षण नाही व जो एकमेव कायदा आहे, तो कधीच अंमलात आला नाही. सामान्य माणसाला जेवढे अभिव्यक्ती स्वातंत्र्य तेवढेच पत्रकारांनाही आहे. त्यामुळे साहजिक त्याला धमकावणे, गुन्हे दाखल करणे असे प्रकार घडत असतात. पण पत्रकारिता अस्तित्वात असेल, तरच लोकशाही सुद्धा अस्तित्वात असू शकते, हे सुद्धा एक सत्य आहे. तसे पाहिले तर आता या क्षेत्रात पूर्वीसारखा निष्ठावंत कुणी राहिला नाही, हे ही सत्य आहे. याचे कारण म्हणजे, दूरदर्शनवरील जीवघेण्या स्पर्धा निर्माण करणार्या वृत्तवाहिन्या निर्माण झाल्यामुळे पत्रकारिता क्षेत्रात फारसे गांभीर्य राहिले नाही, पारदर्शकता राहिली नाही. सनसनाटी बातम्यांचे प्रमाण वाढले पण तथ्य फारच कमी असते. आज कोणत्याही वृत्तावर लोक सहजासहजी विश्वास ठेवत नाहीत.

चौथ्या स्तंभाची विश्वासर्हता ढासळायला सुरवात झाली, हेच त्याचे द्योतक आहे. चौथा स्तंभ स्वतंत्र आहे, निर्भीड आहे, तो कोणताही प्रश्न सोडवू शकतो, सरकारला जाब विचारू शकतो, हे सारे आजच्या काळात भ्रम ठरले आहे. आज पत्रकारांची अतिशय दयनीय स्थिती आहे. केवळ २० टक्के वरच्या स्तरावरचे पत्रकार सोडले तर ८० टक्के पत्रकार अजुनही वेठबिगारीसारखी कामे करीत आहेत. त्यांना कोणत्याच प्रकारची सवलत नाही, कायद्याचे संरक्षण नाही. जे स्वत: आश्रित आणि अत्याचारित आहेत, त्यांच्याकडून परिवर्तनाची, क्रांतीची कशी काय अपेक्षा करायची, असे शैलेश पांडे यावेळी म्हणाले. कार्यक्रमाला जिल्हा ग्रंथालय अधिकारी अधिकारी डॉ. सूरज मडावी, वाचनालयाचे सचिव रवी पिंपळगावकर, माजी सिनेट सदस्य बाळासाहेब यादगिरे, कवी विष्णू सोळंके, जगदीश सायसिकमल, राजूभाऊ भोयर, डॉ. दिलीप देशमुख, श्रीभाऊ चिमोटे, मधुकर पिंगे, विनायक खोलकुटे आदी उपस्थित होते.

## शकुंतला रेल्वे पुन्हा सुरू करा

### – खा. बोंडे यांची संसदेत मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** दिल्लीत सुरू असलेल्या संसदेच्या अधिवेशनात बुधवारी राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी शुन्य प्रहरमध्ये अचलपुर ते मुर्तिजापुरमार्गे यवतमाळपर्यंत धावणार्या शकुंतला रेल्वेचा प्रश्न उपस्थित केला. सरकारचे लक्ष वेधून त्यांनी ही रेल्वे सुरू करण्याची मागणी केली. खा. अनिल बोंडे यांनी पुढे म्हणाले, अचलपुर – मुर्तिजापुर – यवतमाळ हा रेल्वे मार्ग इंग्रज कंपनीच्या ताब्यात होता. परंतु, काही वर्षापूर्वी हा मार्ग सरकारने नेलसन कंपनीच्या ताब्यातुन परत घेतला. त्याचे पुढे नॅरोगेज मधून ब्रॉड गेज मध्ये रूपांतरण करणे बाकी आहे.

इंग्रज काळात नफ्यात असलेला हा मार्ग अचलपुर, मुर्तीजापुर, यवतमाळ या भागातला कापूस, कपडा व्यापार करायचा मुख्य मार्ग होता.



परंतु, हा मार्ग गेल्या दहा वर्षापासून बंद पडलेला आहे. हा मार्ग सुरू झाल्यास मेळघाट तसेच अचलपुर, दर्यापुर, यवतमाळ हा भाग थेट दिल्ली ते मुंबईपर्यंत जोडता येणार आहे. हा मार्ग सुरू करण्याकरिता रेल्वेला जागेचा प्रश्न नाही. कारण, रेल्वेकडे ती जागा आधीच असून फक्त ब्रॉडगेजमध्ये रूपांतरण करावे लागणार आहे. केंद्र सरकारने या मार्गाकडे लक्ष देऊन हा मार्ग सुरू करण्याची मागणी खासदार डॉ अनिल बोडे यांनी केली. माजी खा नवनीत राणा यांनी देखील गेल्या वर्षी अधिवेशनात शंकुतला रेलवेचा मुद्दा उपस्थित केला होता.


## अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेत अपडेट संगणक प्रणाली कार्यान्वित

### जुनी प्रणाली बदलली, ऑनलाइन कामकाज होणार गतिमान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सन २००९ मध्ये सुरू केलेले बँकेतील संगणकीय कामकाजात ऑनलाइन कामकाजाकरिता अद्ययावत सुविधा नसल्याने सत्ताधारी संचालक मंडळाने जुनी संगणकीय प्रणाली बदलविण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार ३१ जुलै रोजी बँकेने नव्याने खरेदी केलेली अपडेट संगणक प्रणाली कार्यन्वित के

या प्रणालीचा श्रीगणेशा बुधवारी बँकेचे अध्यक्ष तथा आमदार बच्चू कडू यांच्या उपस्थितीत करण्यात आला.




जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत तत्कालीन संचालक मंडळाने बँकेचे कामकाज संगणकीकत करण्यासाठी२००९ मध्ये संगणक प्रणाली खरेदी केली होती.परंतु, ही प्रणाली जुनी झाल्याने संगणकीय कामकाजासाठी अपडेट संगणक प्रणाली खरेदी करणे आवश्यक होते. त्यानुसार विद्यमान बँकेतील सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी नवीन संगणक खरेदी केली आहे.


या नवीन संगणक प्रणालीने बँकेच्या मुख्यालयासह ९३ शाखाचे कामकाज अपडेट ऑनलाइन संगणकीय प्रणालीचा शुभारंभ बँकेचे अध्यक्ष तथा आमदार बच्चू कडू, उपाध्यक्ष अभिजित ढेपे, संचालक नरेशचंद्र ठाकरे, अजय मेहकरे, आनंद काळे, जयप्रकाश पटेल, चित्रा डहाणे व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र बकाल उपस्थित होते.

## अमोल मिटकरी कार तोडफोड प्रकरण

# मनसेनेच्या जिल्हाध्यक्षांसह तिघांना जामीन मंजूर!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अकोला :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या टीका केल्याने अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांच्यावर मंगळवारी दुपारी २.३० वाजताच्या सुमारास मनसे जिल्हाध्यक्षांसह १३ जणांना हल्ला करण्याचा प्रयत्न करीत, त्यांच्या कारची तोडफोड केली. या प्रकरणात सिव्हिल लाइन पोलिसांनी मंगळवारी रात्री गुन्हे दाखल केल्यानंतर मनसे जिल्हाध्यक्ष व शहराध्यक्षासह एकास अटक केली. सत्र न्यायालयाने बुधवारी तिघांना जामिन मंजूर केला.



मंगळवारी दुपारी शासकीय विश्रामगृह येथे मनसेची पक्षाचे सरचिटणीस कर्णबाळा दुनबळे यांच्या उपस्थितीत बैठक सुरू असताना, अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी हे विश्रामगृहावर आले असल्याची माहिती मिळाल्यावर मनसैनिकांनी ते थांबलेल्या कक्षात मोर्चा वळविला आणि शिवीगाळ आणि एकेरी भाषा वापरत, त्यांनी मिटकरी बसलेल्या कक्षाचा दरवाजा ठोठावला. परंतु तेथील कार्यकर्त्यांनी मनसे कार्यकर्त्यांना आत शिरू दिले नाही. त्यामुळे नारेबाजी करीत, मनसैनिकांनी बाहेर उभ्या असलेल्या आमदार मिटकरी यांच्या कारवर दगडफेक करीत, कारच्या काचा फोडल्या. या प्रकरणात आमदार अमोल मिटकरी यांच्या तक्रारीवरून सिव्हिल लाइन पोलिसांनी जिल्हाध्यक्ष पंकज साबळे, शहराध्यक्ष सौरभ भगत, दीपक बोडखे, कर्णबाळा दुनबळे, अरविंद शुक्ला, ललित यावलकर, मंगेश देशमुख, जय मालोकार, रूपेश तायडे, योगेश वाघमारे, मनसे महिला आघाडी प्रमुख प्रशंशा अंबेरे, सचिन गालट, मुकेश धोंडफळे यांच्यासह इतर कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले. त्यापैकी साबळे, भगत व बोडखे यांना पोलिसांनी बुधवारी अटक करून दुपारी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने तिघांनाही जामिन मंजूर केला. उर्वरित मनसैनिक फरार आहेत.

### जय मालोकार यांच्यावर गावी अंत्यसंस्कार

मंगळवारी दुपारी झालेल्या हल्ला प्रकरणात मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष जय मालोकार(२७) हेसुद्धा सहभागी झाले होते. मंगळवारीच दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास, त्यांना अस्वस्थ वाटत असल्याने, खाजगी रूग्णालयात भरती केले. परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याचे सांगण्यात येत आहे. बुधवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात निंबी गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### अमित ठाकरे घेणार जयच्या कुटूंबियांची भेट

मंगळवारी झालेल्या तोडफोड प्रकरणानंतर विद्यार्थी सेनेचा जय मालोकार यांचे आकस्मिक निधन झाले. त्यामुळे मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी त्यांचा नाशिक येथील दौरा रद्द केला आहे. अमित ठाकरे हे गुरूवारी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास कारने अकोल्यात येणार आहेत. अकोल्यातून ते निंबी येथे जाऊन जय मालोकार यांच्या कुटूंबियांची भेट घेऊन, त्यांचे सांत्वन करणार आहेत.

# लाडक्या बहिणीचे तीन लाख ७८ हजारांवर अर्ज, छाननी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती –** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी आतापर्यंत जिल्हाभरामधून ३ लाख ७८ हजार ३६० महिलांनी अर्ज दाखल केले. ३१ जुलैपासून जिल्ह्यात अर्जाच्या छाननीला सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यानंतर काही दिवसांनी कागदपत्रांमध्ये बदल केला होता. विशेष म्हणजे, योजना जाहीर झाल्यानंतर कागदपत्रांसाठी नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या.




शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेला महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून आतापर्यंत जिल्हाभरात ३ लाख ७८ हजार ३६० अर्जदाखल झालेत. ३१ जुलैपासून तालुकानिहाय अर्जाची छाननी सुरू झाली आहे. यापैकी किती महिलांचे अर्ज पात्र ठरतात आणि किती बाद होतात, हे येणाऱ्या काही दिवसांमध्ये कळणार आहे. या योजनेंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याची घोषणा शासनाने केली आहे. या योजनेचा लाभ मिळावा म्हणून महिला अर्ज भरण्यासाठी गर्दी झाली होती. बुधवारी छाननीला सुरुवात झाली असून पात्र-अपात्रांची यादी विधानसभा मतदारसंघ निहाय जाहीर केली जाणार आहे. त्यानंतर ही यादी समिती कडे पाठविली जाणार असून ग्रामपंचायत स्तरावर चावडी वाचनाद्वारे पात्र- अपात्रांची नावे जाहीर होणार आहेत.

### ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज

अर्जाची छाननी होणार असली तरी महिला ३१ ऑगस्टपर्यंत या योजनेचे अर्ज भरू शकणार आहेत. २९ जुलैपासून छाननीचे काम सुरू झाले आहे. आता ऑनलाइन अर्जच स्वीकारले जातील. शासनामार्फत रक्षाबंधनाच्या पर्वावर लाडक्या बहिणींच्या खात्यात दीड हजारांची रक्कम जमा केली जाणार आहे.

जिल्ह्यासाठी या योजनेचे साडेचार लाख उद्दिष्ट ठेवले आहे. आतापर्यंत तीन लाख ७८ हजारांवर अर्ज प्राप्त झाले आहेत. बुधवारपासून छाननी सुरू असून त्यानंतर विधानसभानिहाय समितीकडे पाठविली जाईल. ग्रामीण भागात चावडी वाचनाद्वारे यादीचे वाचन होईल.

**– डॉ. कैलास घोडके,**
डेप्युटी सीईओ, महिला व बालकल्याण विभाग.

# रस्ता दुरुस्ती करा, अन्यथा ९ ऑगस्ट रोजी रस्ता फोडो आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** अर्जुननगर ते एस डी बंगला हा रस्ता उघडून गेला असून तो त्वरित दुरुस्त करण्यात यावा, अन्यथा ९ ऑगस्टला आंदोलन करणार असल्याचा इशारा प्रहारचे चंदू खेडकर यांनी मनपा आयुक्तांना मंगळवारी (ता.३१) निवेदनातून दिला आहे.अर्जुननगर ते एसएसडी बंगला रस्ता हा वर्दळीचा असून शेकडो नागरिक दर दिवसाला अवागमन करतात. रस्त्याचे गत फेब्रुवारी महिन्यापासून मे महिन्यापर्यंत जवळपास सतत काम चालू होते. बांधकामात भ्रष्टाचार झाला

असल्याचा आरोप चंदू खेडकर यांनी निवेदनातून केला आहे.रस्ता आठ दिवसात सुस्थितीत करण्यात यावा, अन्यथासंबंधित रस्त्यावर ९ ऑगस्टच्या क्रांतीदिनी रोड फोडो आंदोलन करण्यात येईल, इशारा निवेदनातून दिला आहे.



# फसवणूक करणारी महिलांची टोळी गजाआड

## विदेशी चलन देण्याचे आमिष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१दर्यापूर**



विदेशी चलन देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणार्या तीन महिलांचा सहभाग असलेल्या आंतरराज्यीय महिला टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गजाआड केले आहे. ही कारवाई बुधवारी करण्यात आली. शांतामीर फिरोजमीर (वय २७ वर्ष, रा. मुजफराबाद), शिल्पीबेगम भुरहान शेख (वय ४०, रा. पो. बेगूर, कर्नाटक, नाझीया मोहंमद इम्रान (वय ३२ वर्ष, रा. जे.जे कॉलनी नॉर्थवेस्ट दिल्ली) असे अटकेतल्या महिलांची नावे आहेत. २८ जुलैला उमेश सुरेश गावंडे (वय ३८ वर्ष, रा. दर्यापूर) यांनी दर्यापूर पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

२६ जुलैरोजी त्यांच्या मिनी बँक ऑनलाईन सेंटरवर दोन अज्ञात इसमांनी व एका महीलेने आपल्या जवळील विदेशी नोटा दाखवून ते भारतीय चलनात बदलून देतो का अशी विचारणा केली. त्यानंतर उमेश यांच्या जवळील ५० हजार रोख घेवून त्याला एका कॉलेज बॅगमध्ये विदेशी चलनाच्या नोटा असल्याचे सांगून ती बॅग दिली. त्याने ही बॅग काही अंतरावर जावून पाहिली असता एका रूमालमध्ये रद्दी पेपर गुंडाळून असल्याचे दिसून आले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी दर्यापूर पो.स्टे.ला तक्रार दिली. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस अधीक्षक विशाल आनंद गुन्हे शाखेला गुन्हा उघडकीस आणण्याचे निर्देश दिले. उपलब्ध तांत्रिक पुराव्यावरून व गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून सदर आरोपी हे मुर्तीजापूर येथे वास्तव्यास असून तेथून आजूबाजूचे जिल्ह्यात जावून लोकांना त्यांचेकडील विदेशी चलन दाखवून ते विदेशी चलन भारतीय चलनात अर्ध्या पैशात बदलून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करण्याचे तयारीत आहे, अशी माहिती मिळाली. त्या आधारावर आरोपी राहत असलेल्या जागी छापा टाकण्यात आला. उपरोक्त तीन महिलांना ताब्यात घेण्यात आले. खोलीची झडती घेतली असता एका बॅगमध्ये विदेशी चलनाच्या १० डॉलर नोटा, ५ यु.ए.ई दिरहम नोटा, २ लाख ६५ हजार २५० रूपये, वेगवेगळया कंपनीचे एकूण १० मोबाईल असा मुद्देमाल मिळाला व तो जप्त करण्यात आला. या महिलांसोबत असणार्या पुरूष आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक किरण वानखडे, सुनील वानखडे यांचे नेतृत्वात स.पो.नी. अभय चौथनकर व अंमलदार त्रंबक मनोहर, सुनील महात्मे, सैयद अजमत, निलेश डांगोरे, श्याम मते, सिध्दार्थ आठवले, उमेश वाकपांजर, प्रभाकर डोंगरे, प्रतीभा लूंगे, किरण सरदार, चेतन गुल्हाने, रितेश वानखडे यांनी केली.

# गजानन महाराजांचा मुखवटा चोरणारा अटकेत

## मुखवटा विकत घेणारेही ताब्यात, तीन मंदिरात चोरीची कबुली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** पूर्णानगर येथील गजानन महाराज मंदीराच्या दरवाज्याचे कडीकोंडा तोडुन मंदिरातील दानपेटीतील नगदी तसेच मंदीराच्या कपाटात ठेवलेला अष्टधातुचा गजानन महाराजांचा मुखवटा चोरणार्याला व तो विकत घेणार्या दोघांना गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. अजय गोवर्धन दांडगे (वय ३२ वर्ष, रा. तळणी पूर्णा, ता.चांदुरबाजार असे चोरी करणार्याचे तर शकिल खा रसुल खा (वय २५ वर्ष रा. सुफी नगर, वलगाव), एजाज खा बशीर खा (वय ३० वर्ष रा. कसाबपुरा, वलगाव) असे मुखवटा विकत घेणार्यांची नावे आहेत. मुखवटा




चोरीला गेल्याची व दानपेटी फोडल्याची तक्रार आसेगाव पूर्णा पोलिस ठाण्यात आली होती. गुन्हा नोंद करून आसेगाव पोलिसांनी व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी समांतर तपास सुरू केला.

तपासा दरम्यान गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनिय माहीतीवरून अजय गोवर्धन दांडगे याला वलगाव येथून ताब्यात घेण्यात आले. पूर्णानगर येथील गजानन महाराज मंदिर चोरी संबधाने विचारपुस केली असता त्याने आधी उडवाउडवीचे उत्तरे दिली. विश्वासात घेवून पुन्हा विचारपुस केली असता त्याने पूर्णानगर येथील गजानन महाराज मंदिरातील गजानन महाराजांचा मुखवटा चोरल्याची कबुली देवून सदर मुखवटा वलगाव येथील शकिल खा व एजाज खा यांना विकल्याचे सांगितले. पोलिसांनी वलगाव येथून त्यांना ताब्यात घेतले. त्यांनी कबुली दिली. मुखवटा जप्त करण्यात आला आहे. आरोपी अजय दांडगे याने येलकी पूर्णा येथील नृसिंग महाराज मंदिरात, वरुड येथील साई मंदिर व नरहरी महाराज मंदिरात चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून ३ हजार ९०० रुपये जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक किरण वानखडे, सहा. पोलिस निरीक्षक सचिन पवार, पोलिस अंमलदार युवराज मानमोठे, रवींद्र वर्हाडे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने, संजय प्रधान यांनी केली.

# आरटीई प्रवेशाला ५ दिवसाची मुदतवाढ, ५ऑगस्ट पर्यंत करता येणार प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती –**आरटीई अंतर्गत प्रवेश निश्चित करण्याकरता बालकांना ५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे आता पालकांना आपल्या पाल्यांचे प्रवेश ५ ऑगस्ट दरम्यान निश्चित करता येणार आहे. ३१ जुलैपर्यंत जिल्ह्यात २३०० पैकी केवळ १ हजार ७० प्रवेश निश्चित झाले असुन अद्यापही १ हजार ३०० प्रवेश शिल्लक आहेत. त्यामुळे या पाच दिवसांत यातील किती प्रवेश निश्चित होतात, याकडे लक्ष लागले आहे.आरटीई प्रवेश प्रक्रियेला २३ जुलैपासून सुरूवात करण्यात आली. जिल्ह्यात २३४ शाळांमध्ये प्रवेश निश्चित करावयाचे असून या शाळांमध्ये २३००जागा आरक्षितकरण्यात आल्या आहेत. याकरता ६ हजार ६२६ बालकांचे ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले आहेत. या प्राप्त अर्जाची – लॉटरी पुणे येथे काढण्यात आली असून पहिल्या टप्यात २ हजार ३०० बालकांच्या नावांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रवेशाबाबत पालकांना संदेश देण्यात आले आहेत. तसेच २ हजार ३०० बालकांची




प्रतीक्षा यादी देखील तयार करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात २३ ते ३१ जुलै दरम्यान प्रवेश प्रक्रिया राबवण्यात आली होती. परंतु, या १० दिवसांत १ हजार ३०० जागा अद्यापही रिक्त असल्याने शिक्षण विभागाने या प्रवेश प्रक्रियेला पुन्हा पाच दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे ५ ऑगस्टपर्यंत बालकांचे प्रवेश शाळांमध्ये स्विकारले जाणार आहे. पहिल्या यादीतील प्रवेशानंतरच प्रतीक्षा यादीतील प्रवेश स्वीकारले जाणार आहे. त्यामुळे निवड यादीत नाव असलेल्या पालकांना बालकांच्या प्रवेशाचे सर्व कागदपत्रे घेऊन ग्रामीण भागात पंचायत समिती येथील पडताळणी समितीकडे तर शहरात मनपा शिक्षण विभागाकडे सादर करणे अपेक्षित आहे. या पडताळणी नंतरच समितीच्या शिफारशीने संबंधित शाळांमध्ये प्रवेश निश्चित केले जात आहे. या पाच दिवसांत १ हजार ३०० पैकी किती प्रवेश निश्चित होतात, याकडे लक्ष लागले आहे.

# उपायुक्त माधुरी मडावी यांनी केली महादेवखोरी, दस्तुरनगर चौक, कठोरा रिंग रोड परिसराची पाहणी

## प्लास्टीक व डस्टबीन बाबत हॉकर्सची पाहणी करुन केला दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १अमरावती–** अमरावती महापालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी आज दिनांक ३१ जुलै,२०२४ रोजी महादेवखोरी, दस्तुरनगर चौक, कठोरा रिंग रोड या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच महापालिका मुख्यालयातील आपत्ती व्यवस्थापन मध्यवर्ती केंद्रातून पावसाळी स्थितीवर बारीक लक्ष ठेवत संबंधित यंत्रणेने क्षेत्रामध्ये जाऊन पाणी साचलेल्या ठिकाणी तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने उपायुक्तांच्या नियंत्रणा खाली सहाय्यक आयुक्त, वैद्यकीय अधिकारी आणि संबंधित अधिकारी, कर्मचारी आपापल्या कार्यक्षेत्रात दक्षतेने कार्यरत होते. महादेवखोरी, दस्तुरनगर चौक, कठोरा रिंग रोड या भागात पाणी साचते, याची दखल घेत महापालिकेच्या मदतकार्य यंत्रणेस आपल्या क्षेत्रात सज्ज राहण्याचे निर्देश उपायुक्त माधुरी मडावी यांनी दिले. उपायुक्त माधुरी मडावी यांनी स्वत:ही फिरून प्रत्यक्ष परिस्थिती बघितली व यंत्रणेला गतीमान केले. या दरम्यान अतिवृष्टीमुळे पाणी साचलेल्या काही ठिकाणी स्वत: उभे राहून उपायुक्तांनी पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने पदपथावरील गटारांची झाकणे उघडून मोठ्या प्रमाणात वाहत येणारे पाणी रस्त्यावर साचून राहू नये म्हणून वाहत्या पाण्याला मोकळी वाट करून देण्याचीही कार्यवाही आपल्या देखरेखीत करून घेतली. संबंधित स्वास्थ निरीक्षकाला परिसरातील संपूर्ण स्वच्छता करण्याचेही निर्देश यावेळी देण्यात आले. सदर परिसरातील नालीची साफ करण्याची कार्यवाही करण्यात आली. सदर नाल्यातील गाळ काढून नाली वाहते करण्यात आले. दस्तुरनगर चौक परिसरात अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई उपायुक्त माधुरी मडावी यांच्या उपस्थितीत आज दस्तुरनगर परिसरात अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यात आली. प्रत्येक हॉकर्सने दोन डस्टबीन ठेवण्याचे निर्देश यावेळी



उपायुक्त यांनी दिले. सदर हॉकर्सने परिसर स्वच्छ ठेवावे असे निर्देशही यावेळी देण्यात आले. दस्तुरनगर परिसर संपूर्ण स्वच्छ व्हावा याच्यासाठी या परिसरातील स्वच्छता कर्मचारी, व्यापारी व हॉकर्स यांनी संयुक्त स्वच्छता मोहीम राबावावी अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या. या परिसरात नालीवर कोणीही दुकान लावू नये असे सक्त निर्देश यावेळी त्यांनी दिले.

शहरातील अतिक्रमण, पदपथांवर मुक्काम ठोकणारे फिरस्ते आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून संयुक्त कारवाई केली जात आहे. पाहणी दरम्यान प्रत्येक हॉकर्सची भेट घेवून त्यांच्याशी चर्चा केली. या परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर महापालिका धडक कारवाई करत आहे. या पाहणी दरम्यान सदर हॉकर्सची तपासणी केले असता त्यांच्याकडून प्लास्टीक पन्नी आढळून आल्याने सदर हॉकर्सला दंड करण्यात आला. यावेळी हॉकर्सकडे डस्टबीन न आढळून आल्याने सदर हॉकर्सला दंड करण्यात आला. यावेळी सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी, पूजा कंस्ट्रक्शनचे प्रतिनिधी, कंत्राटदार, सफाई कामगार उपस्थित होते.

# प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घाला

## हायकोर्टात जनहित याचिका, सरकारला नोटीस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

देवांच्या मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) बनविण्यावर बंदी घालण्याच्या आदेशावर अंमलबजावणी व्हावी, यासाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली आहे. याबाबत न्यायालयाने राज्य सरकारला बुधवारी नोटीस बजावली.

मुख्य न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी होती. पर्यावरणपूरक साहित्य वापरून मूर्ती तयार करणार्या उत्पादकांची यादी सादर करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले.

जलाशयात पीओपीच्या देवांच्या मूर्ती विसर्जन करण्यास बंदी घालण्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि मुंबई महापालिकेसह अन्य प्राधिकरणे सपशेल अपयशी ठरले आहेत, असा आरोप जनहित याचिकाकर्ते रोहित जोशी यांनी केला आहे. जलाशयात विसर्जन होणार्या मूर्ती पीओपीने बनविण्यास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) मनाई केली आहे.सीपीसीबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ठरावीक जलाशयांत पीओपीच्या मूर्ती विसर्जन करणे बंधनकारक आहे. पीओपीच्या मूर्ती बनविणा-यांना खूश करण्यासाठी सरकार निर्णयाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करत आहे, असा आरोपही जोशी यांनी केली आहे. अधिकारी मनमानीपणे वागतात आणि पीओपीच्या कारभाराकडे दुर्लक्ष करतात, असे याचिकेत म्हटले आहे.

# स्वस्तिक गार्डनसह शहरात चार ठिकाणी 'मियावाकी' प्रकल्प

## छोट्या जागेतही घनदाट जंगलांची निर्मिती : हिरवळीसाठी यंदा ५० हजार १५३ रोपांची लागवड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

पावसाळ्याच्या अनुषंगाने यावर्षी महापालिकेच्या वतीने वृक्षारोपणाचे जवळपास ९० टक्के उद्दीष्ट पूर्ण केले आहे. त्याअंतर्गत शहरातील निंभोरा परिसरातील समर्थ टाऊनशिप परिसरात तब्बल दोन हजार रोपांची लागवट करून 'स्वस्तिक गार्डन' तयार करण्यात येत आहे. याशिवाय प्रामुख्याने कमी जागेत घनदाट जंगलांच्या निर्मितीसाठी चार ठिकाणी 'मियावाकी' प्रकल्प राबविण्याद येत आहे

शहरातील नवसारी भागातील यशोमंगल कॉलनी, सौरभ कॉलनी,शिवार्पण नगर आणि वासूदेवनगर वा चार ठिकाणी प्रत्येकी दोन हजार चौरस फूट जागेवर एक हजार फळे, फुले, दाट सावली आणि मुबलक ऑक्सिजन उत्सर्जित करणार्या वनस्पतीच्या लागवड 'मियावाकी' प्रकल्प साकारण्यात आहे. दरम्यान, महापालिकेला साया वनिकरण विभागाकडून सुमारे ५० हजार १५३ रोपट्यांचा पुरवठा करण्यात आला होता. त्यापैकी ४२ हजार रोपट्यांचे नागरिकांसह सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मदतीने शहरात ठिकठिकाणी लागवड करण्यात आली आहे. तसेच या झाडांचे जीओ टॅगींग करण्यात येत असून, त्याद्वारे किती झाडे जगतात, यावर लक्ष ठेवण्यात येत आहे.

**मियावाकी प्रकल्प म्हणजे काय?**

मियावाकी ही मानवनिर्मित जंगल पद्धती असून, यामध्ये परिसंस्था अभियांत्रिकेद्वारे कमीत कमी जागेत जास्तीत जास्त देशी वृक्षांची लागवड केली जाते. जपानच्या अकीरा मियावाकी या वनस्पती शास्त्रज्ञांनी ही पद्धती विकसित केल्याने त्यांच्याच नावावरून ही पद्धत जगभरात ओळखली जाते. या पद्धतीनुसार लावलेली झाडे पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत १० पट वेगाने वाढतात. त्यामध्ये १०० पट अधिक जैवविविधता आहे. या झाडांना पहिल्या दोन-तीन वर्षानंतर देखभालीचीही गरज नसते. हा वन प्रकल्प ३०० चौरस फुट एवढया लहान जागेवरही साकारता येऊ शकतो, अशी माहिती उद्यान विभागाकडून देण्यात आली.

# समाजिक बांधीलकी जोपासून डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ चांदूर बाजार**

शहरामध्ये विविध समाजिक उपक्रम राबवून साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे जयंती महोत्सव समिती च्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते गुरुवार १ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता बेलोरा ऑटो स्टॉप परिसरात लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले यासह चांदूर बाजार शहरात भव्य प्रभात फेरी काढून विद्यालयातील विध्यार्थ्यांनी हातामध्ये जनजागृतीचे पोस्टर घेऊन विविध सामाजिक उपक्रम राबवा अशे आव्हान नागरिकांना केले या प्रभात फेरी मध्ये मोठ्या संखेत विधार्थी व नागरिक सहभाग झाले होते यासह गो.सी.टोम्पे महाविद्यालय,जिजामाता विद्यालय,नगर परिषद विद्यालय व जि.आर.काबरा विद्यालयाचे विध्यार्थी आणि शिक्षक- शिक्षिका शामिल झाले होते बेलोरा स्टॉप,पोलीस स्टेशन,जयस्तंभ चौक,सरदार वल्लभाई पटेल चौक,माळी पुरा,उपजिल्हा रुंगणालय,गाडगे नगर, महाराणा प्रताप चौक या मार्गांवरून ही प्रभात फेरी काढण्यात आली होती भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर बालोद्यान मध्ये शिक्षक व विध्यार्थांच्या हस्ते वृक्ष रोपण करून व डॉ.बाबासाहेब अंबडेकर यांच्या स्मारकाचे पूजन करून प्रभात फेरीचे समारोप करण्यात आले चांदूर बाजार लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समिती ने अथक प्रयत्न केले होते या प्रसंगी गोपाल डोंगरे सेवा निवृत्त शिक्षक,मीरा खडसे माजी नगर सेविका, सरिता पोटफोडे,प्रफुल कात्रे शिक्षक,सुरेश खडसे, मनोज दखणे,राजू तंतरपाळे,श्रावण चव्हाण,संदीप मानमोडे,मुन्ना नन्देश्वर,करण खंडारे,अजय तागडे,अंकुश तागडे,चेतन खडसे सह शिक्षक,विद्यार्थी व नागरिक मोठ्या संखेत उपस्थित होते.

# लाडक्या बहिणींचा ११ वी प्रवेशासाठी ठिय्या आंदोलन

## विद्यार्थिनींचा शिक्षक उपसंचालकांच्या कार्यालयात ठिय्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर येथील एका कनिष्ठ महाविद्यालयात अकरावीला प्रवेश घेणारे तब्बल शंभर विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले आहेत. बुधवारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शिवसैनिकांसह विद्यार्थ्यांनी शिक्षक उपसंचालक कार्यालयावर धडक दिली. यावेळी कार्यालयाला घेराव घालत उपसंचालकांच्या दालनात तब्बल दोन तास ठिय्या आंदोलन करण्यात आले. लाडक्या बहिणींना अकरावीत प्रवेश द्या साहेब, असे फलक हातात घेऊन विद्यार्थिनींनी उपसंचालकांकडे मागणी रेटली. लेखी आश्वासनानंतर मात्र आंदोलन मागे घेण्यात आले.

नांदगाव तालुक्यात वर्ग अकरावीचे विज्ञान शाखेचे अनुदानित एकच महाविद्यालय असून दरवर्षी विद्याथ्यर्थ्यांना प्रवेशासाठी अडचण निर्माण होते. यंदाही सुमारे १०० विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले आहेत. एक महिन्यापासून विद्यार्थी महाविद्यालयात चकरा मारत असल्याचे शिवसैनिकांचे म्हणणे आहे. महाविद्यालयाने वाढीव प्रवेश देण्याची मागणी करूनही शिक्षण विभागाने परवानगी दिली नाही. यामुळे शिवसेना (ठाकरे) गटाचे युवासेना माजी जिल्हाप्रमुख प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेकडो विद्यार्थ्यांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयात धडक देऊन उपसचालकांच्या कार्यालयात तब्बल दोन तास ठिय्या आंदोलन केले.

यावेळी शिक्षण आमच्या हक्काचे, साहेब लाडक्या बहिणींना अकरावीत प्रवेश द्या यासारखे घोषणापत्र दाखवून शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी नारेबाजी करून परवानगी मिळाल्याशिवाय कार्यालय सोडणार नाही असा आक्रमक पवित्रा आंदोलक विद्यार्थ्यांनी घेतला. अखेर साहाय्यक उपसंचालक अनिल कोल्हे यांनी दोन दिवसांत वाढीव प्रवेश क्षमतेला परवानगी देण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतरच आंदोलन मागे घेण्यात आले. दरम्यान, अचानक झालेल्या ठिय्या आंदोलनाने कार्यालयातील कामकाज ठप्प झाले होते. आंदोलनात शिवसेनेचे प्रकाश मारोटकर, शुभम रावेकर, होमदेव वाळके, गजानन मेश्राम, अक्षय हिवराळे, सुमित लोमटे, तन्मय जिचकार, यश मारब्दे, अमन मानकर यांच्यासह शेकडो विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# आजच्या स्पर्धा परीक्षेतुन भविष्यातील अधिकारीचे स्वप्न -शिक्षण उपसंचालक शिवलिंग पटवे

## भातकुली पं.स.मधिल शिष्यवृती,नवोदय,NMMS परीक्षेतील पात्र विद्यार्थांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१भातकुली**

आज शाळा स्तरावर होणार्या स्पर्धा परीक्षा त्यात विद्यार्थांनी मिळवलेले यश यातुनच भविष्यातील उच्च अधिकारी होऊ शकतो.आपण यशाचे शिखर गाठावे शिक्षक,पालक यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे.भातकुली पं.स.मधिल अधिकारी,शिक्षक विद्यार्थांना स्पर्धा परीक्षेचे महत्व देत आहे हे अभिनंदनिय बाब आहे.असे उद् गार अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालक शिवलिंग पटवे यांनी भातकुली येथे आयोजित भातकुली पं.स.मधिल विद्यार्थांच्या गुणगौरण सोहळ्यात काढले हा सोहळा भातकुली येथिल आर्शिवाद मंगल कार्यालयात बुधवार दि.३१जुलैला संपन्न



झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण उपसंचालक शिवलिंग पटवे होते तर प्रमुख अतिथी प्राथमिक शिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने, गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे,शालेय पोषण आहार अधिक्षक नरेन्द्र गायकवाड, शिक्षण विस्तार अधिकारी एकनाथ अंबुलकर,उपस्थित होते.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला हारार्पण करून दिप प्रज्वलाने कार्यक्रमाला सुरुवात झाली.यावेळी अंचलवाडी शाळेच्या विद्यार्थांनी स्वागत गीत सादर केले.यावेळी भातकुली तालुक्यातील जिल्हा परीषद शाळा,खाजगी शाळेच्या २१० विद्यार्थी, पालक, शिक्षक यांचा स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व मेडल देऊन सत्कार करण्यात आला.

वर्ग५वी (शिष्यवृत्ती प्रथम - १) चंचल शिंदे (पेढी) द्वितीय श्रृती मनोहर गायकवाड म्हस्पूर तृतीय - ३) पल्लवी बंडू तेतरपाळे (धामोरी)वर्ग ८वी शिष्यवृत्तीप्रथम - १) आयल संतोष खर्चान द्वितीय - २) नंदीनी अभील महले तृतीय - ३) खुशी रजिंद्र माहीड(सर्व धामोरी विद्या विद्यालय,वर्ग ५वी नवोदयप्रथम १) श्रेया अंकुश भरकर द्वितीय २) इश्वरी विलास राऊत श्री विनायका इंग्लीश प्रायमरी स्कूल प्रणनिगर,वर्ग ८वी छचवड,प्रथम १) सृष्टी बाळू पावडे (छोगालाल विद्यालय, द्वितीय २) अस्मीन विकास विस्तार जिया, तृतीय ३) खुशीम प्रदिप रोराळे (भामद)यांचा विशेष सत्कार करण्यात आला.तसेच आदर्श शाळा,केंद्र आणि केद्र प्रमुख,शिक्षक यांचा सुध्दा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे यांनी तर सुत्र संचालन शैलेन्द्र दहातोंडे यांनी आभार प्रदर्शन उमेश चुनकीकर यांनी केले.कार्यक्रमाला भातकुली तालुक्यातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक,बीआर सी मधिल विषय तंज्ञ मोठ्या संखेने उपस्थित होते.

# वरूडात कॅफेवर धाड; चार तरुण ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१वरूड :**

प्रेमीयुगुलांना जागा उपलब्ध करून देणार्या पार्डी चौकातील एका कॅफेवर वरूड पोलिसांनी बुधवार, ३१ जुलै रोजी धाड टाकली. या कारवाईत ४ तरुणांसह २ तरुणींना ताब्यात घेण्यात आले. समज देऊन त्यांची सुटका करण्यात आली.

शहरातील गजबजलेल्या पार्टी चौकातील एका कॅफेमध्ये प्रेमीयुगुलांना चाळे करायला जागा उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती वरूड पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या कॅफेवर धाड टाकली. या कारवाईत ४ तरुणांसह २ तरुणींना ताब्यात घेऊन ठाण्यात आणण्यात आले. समज देऊन त्यांची सुटका करण्यात आली. ही कारवाई साहाय्यक पोलीस निरीक्षक डेंगळे, राजू चव्हाण, योगेश ढंगारे, सचिन गुडदेवकर, स्वप्ना बारसे यांनी केली. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली होती.

# 'एनर्जी ड्रिंक' मुळे मुलांना हृदयविकाराचा धोका !

## झटपट ऊर्जा पुरविण्याचा दावा करणारी पेय घातक : मुलांमध्ये वाढते नैराश्य आणि चिंता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

व्यायामशाळेत व्यायाम केल्यानंतर किंवा एखादा खेळ खेळल्यानंतर ते एनर्जी ड्रिंक कधी प्यायले होते. निश्चितच, याने त्वरित ऊर्जा दिली असेल आणि ताजेतवाने वाटले असेल. तुम्हाला पुन्हा विचार करण्याचा सल्ला दिला जातो. या पेयांचे सेवन करणाऱ्यांमध्ये अचानक 'हृदयविकाराचा झटका' येण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे नवीन संशोधनाने सूचित केले आहे. फूड लेबलिंगशी संबंधित प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाले आहेत. यामुळे भारतीय अन्न नियामकांचीही दखल घेतली गेली आहे.

ज्यांनी यापूर्वी कंपन्यांना या एनर्जी ड्रिंक्सच्या उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या घटकांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आल्यानंतर त्यांना 'एनर्जी ड्रिंक्स' असे लेबल लावण्यापासून दूर राहण्यास सांगितले होते. झटपट ऊर्जा पुरवण्याचा दावा करणारी ही पेये त्यांचे काम करतात, पण हे मानवी आरोग्यासाठी मोठी किंमत मोजावी लागते.

**प्रमाणाबाहेर साखर व कॅफ्रेन**

ही पेये ज्यात अनेकदा साखरेचे व कॅफ्रेनचे प्रमाण जास्त असते तेदेखील



हृदयविकाराच्या वाढत्या त्रासाशी संबंधित असतात. पेयांमध्ये टॉरिन आणि ग्वाराना सारख्या घटकांचा समावेश आहे. त्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी कार्ये विस्कळीत होऊ शकतात ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो.

**हृदयासंबधी आजाराचा धोका**

झटपट ऊर्जा पुरविण्याचा दावा करणारी एनर्जी ड्रिंक या पेयांचे सेवन करणाऱ्यांमध्ये अचानक'हृदयविकाराचा झटका येण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे नवीन संशोधनाने सूचित केले आहे.

प्रमाणाबाहेर साखर व कॅफ्रेनही पेये ज्यात अनेकदा साखरेचे व कॅफ्रेनचे प्रमाण जास्त असते तेदेखील हृदयविकाराच्या वाढत्या त्रासाशी संबंधित असतात. पेयांमध्ये टॉरिन आणि ग्वाराना सारख्या घटकांचा समावेश आहे. त्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी कार्ये विस्कळीत होऊ शकतात ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो.

**लठ्ठपणा वाढतो**

यामुळे ऊर्जेचा प्रारंभिक स्फोट होऊ शकतो, त्यानंतर लवकरच लक्षणीय घट होऊ शकते. त्यामुळे तुम्हाला निचरा आणि आळशी वाटू शकते. ही एनर्जी ड्रिक्स सवयीने प्यायल्याने लठ्ठपणा वाढू शकतो. मधुमेह आणि दात किडणे यासारख्या आरोग्यविषयक परिस्थितींचा धोका वाढू शकतो.

मानसिक समस्याएनर्जी ड्रिक मुळे व्यवहार संबंधी समस्या होऊ शकतात.

मानसिक आरोग्य व कल्याणवर नकारात्मक प्रभाव पडू शकतो. यासाठी ह्या एनर्जी ड्रिकपासून दूर राहावे.


# माधान येथील रोहयो कामात मोठा भ्रष्टाचार

## मस्टरवर ओबीसी मजुराला एससी दाखवून पैसे काढले : ग्रामपंचायत प्रशासन व रोहयो अधिकाऱ्याची मालीभगत

**सुयोग गोरले**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ चांदुर बाजार**

पावसाळ्यापुर्व नियोजन करण्यासाठी नदी,नाले यांचे खोलीकरण करुन गाळ काढण्याची कामे रोहयो द्वारे ग्रामीणभागात केली जातात.यामुळे पावसाळ्यात गावालगत असलेल्या नाल्याच्या पुराचा धोका कमी होतो.याच पार्श्वभुमिवर चांदूरबाजार तालुक्यातही अशी कामे केल्या गेली आहेत.अशातच माधान येथील गावाच्या मध्यभागी असलेल्या नाल्याचे रोहयो अंतर्गत खोलीकरण व गाळ काढल्याची नोंद शासनदरबारी आहे.परंतु गेल्या आठवड्यात तालुक्यात झालेल्या पावसात माधान येथील नाल्याला पूर येऊन नाल्याचे पाणी अनेक घरामध्ये शिरून गोर गरीब परिवारांचे नुकसान झाले. शासनाने अनेक ठिकाणी निधी मंजूर करून रोहयो अंतर्गत कामे टाकली जात आहे मात्र ग्रामपंचायत स्तरावर प्रशासकीय अधिकारी, पंचायत समिती अधिकारी, व रोजगार





> नाला गाळ खोली करणं चे काम माझ्या अंतर्गत येत नाही या मध्ये माझी कुठेही साईन लागत नाही हे सर्व पंचायत समिती रोजगार हमी योजना विभाग पाहतात.
> **अमोल आडे**
> **ग्रामसेवक माधान**

सेवकांचे माध्यमातून बोगस कामे दाखवून प्रशासनाच्या तिजोरीवर डल्ला मारण्याचा जात असल्याचे माधान येथील नाला गाळ खोलीकरण कामात उघडकीस आला आहे. काही दिवसापुर्वी माधान येथील नाल्या ला मोठा पूर येऊन पाणी गावामध्ये शिरले होते. त्यात नाल्याच्या बाजुला असलेल्या गोर, गरीब, अपंग परिवार यांच्या घरामध्ये पुराचे पाणी शिरले होते. त्यात या परिवारांचे अन्यठिकाणी स्थलांतर करण्यात आले होते. माधान येथील पत्रकार सुयोग गोरले यांनी नालाखोलीकरणाच्या कामासाठी असलेल्या निधीची कशाप्रकारे विल्हेवाट लावली याची पंचायत समीतीमधील रोहयो विभागात चौकशी केली असता २०२३ ते २०२४ या नाला गाळ खोली करणं मध्ये ५ लक्ष मंजूर झाले असल्याची माहिती संबधीत अधिकार्यांनी दिली व त्यांचे काम सुद्धा पूर्ण होऊन मस्टरचे पैसे निघाल्याचे सांगण्यात आले.या कामाची खोलात जाऊन चौकशी केली असता या कामात अनेक बोगस नावे टाकून शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारल्याचा प्रकार निदर्शनात आला. विकासाची कामे चांगली व्हावी या करिता अनेक माध्यमातून लोकप्रतिनिधी व शासध निधी मंजूर करून उपलब्ध करून देते. मात्र माधान येथील रोहयो विभाग व प्रशासकीय अधिकारी यांनी संगनमत करून बोगस नावे.जात

> रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून माझे पती प्रमोद कृष्णराव मोहोड हे काम करण्याकरिता जात असताना त्या ठिकाणी ३० मजूर कामाला असतांना ५० मजूरांचे पैसे काढत होते. ही बाब चुकीची असल्याचे मी सांगीतल्यामुळे त्यांनी काम बंद केले. रोजगार हमी योजनेचे कर्मचारी व अधिकारी यांची मिलीभगत असल्याचे जाणवले. माझ्या पती ची जात ओबीसी असतांना त्यांना एससी दाखवून रोहयोचे पैसे काढले. याची चौकशी करून दोषीवर कारवाई करण्यात यावी.
> **मंजुताई प्रमोदराव मोहोड**

बदलून,पुर आल्याच्या दिवशीनाल्यातील नाल्यातील गाळ काढण्यासाठी मजूर दाखवून नाला खोलीकरणासाठी आलेल्या निधीमधून ४लक्ष ६३ हजार आठशे २७ रु पैसे काढल्याचा प्रकार माधान मध्ये उघडकीस आला आहे. या कामात रोजगार हमी योजने माध्यमातून गावातील शाळकरी विद्यार्थी, महिला, व इतर कामावर प्रत्यक्ष हजर नसणारे नागरिक मस्टर मध्ये प्रतिदिवस ५५ मजूर दाखवून पैसे काढण्याचा प्रकार माधानच्या कामात घडला आहे. तसेच रोहयोच्या कामावरील प्रमोद कृष्णराव मोहोड यांची जात लल असतांना मस्टर वर डउ जात दाखवून पैसे काढल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.येथील नालागाळ खोलीकरणांमध्ये बोगस रित्या कामाची मस्टर काढून पैशाची देवाण-घेवाण मोठ्या प्रमाणात झाली आहे. बोगसरीत्या खोलीकरण दाखवून शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारल्याचा प्रकार माधान मध्ये घडला आहे याची सखोल चौकशी करून दोषी असलेल्या प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी ग्रामवासीयांनी मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी,तहसिलदार यांना निवेदन देऊन केली आहे.

# अनुदान उचलूनही शेडनेट उभारले नाही; वसुली होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मोर्शी**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी- पोकरा व अन्य योजनेंतर्गत फळ, फूलशेती व पालेभाज्यांच्या अधिक उत्पन्नासाठी शेडनेट उभारण्याची योजना आहे. शेडनेट शेती शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे. केवळ १० गुंठ्यांमध्ये दीड लाख रुपयांपर्यंत उत्पन्न घेता येते; मात्र जिल्ह्यात या योजनेला अल्प प्रतिसाद आहे.

बिगरहंगामी पिकांसाठी शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत आहेत. शेडनेट हा त्यातील चांगला उपक्रम ठरला आहे. अल्पभूधारक शेतकरी याचा वापर करून लाखो रुपयांचे उत्पन्न घेत आहेत. शेडनेटची उभारणी २५ टक्के, ५० टक्के व ७५ टक्के या तीन प्रकारची असते. यातील पिकाला सावली व उन्हाचे संतुलित व नियंत्रित वातावरण निर्माण करून उत्पादन वाढवण्यासाठी फायदा होतो. शेतकरी सर्वाधिक उभारणी ५० टक्के शेडनेटची करतात.कारण५० टक्के ऊन व ५० टक्केसावली निर्माण करून वातावरण नियंत्रित करण्यासाठी याचाफायदा होतो.या योजनेत ज्या शेतकऱ्यांनी अनुदान उचलले आहे मात्र अजून पर्यंत शेड नेट उभारले नाही अश्यांकडून आता वसुली होणार आहे.

**अन्य योजनांमधून शेडनेटचा लाभ**

कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या अन्य योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेडनेटचा लाभ दिला जात आहे. आकारमानानुसार शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते.

**अन्य योजनेतून दिला जातो लाभ**

जिल्ह्यात पोकरा योजनेची अंमलबजावणी अजूनपर्यंत झालेली नाही; परंतु अन्य योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेडनेटचा लाभ दिला जातो; परंतु लाभ घेणाऱ्यांची संख्या कमी आहे, असे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी मांगितले

**विद्युत पुरवठा असणे आवश्यक**

शेतकऱ्याची स्वतःच्या मालकीची जमीन व पाणीपुरवठ्याची सुविधा आणि विद्युतपुरवठा असणे आवश्यक आहे. उभारणी करणाऱ्या सेवा पुरवठादाराकडून मार्गदर्शक सूचनामधील आराखड्यानुसार व तांत्रिक निकषाप्रमाणे साहित्याचा वापर करून उभारणी केलेली असल्याबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

# उर्दू शाळेतील शिक्षक वेळेवर येत नसल्याने पालक वर्ग आक्रमक

## चांदूर रेल्वे नगरपरिषदवर दिली धडक : शिक्षकांवर कारवाई करून मुख्यालयी राहण्याची सक्ती करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१चांदूर रेल्वे**

चांदूर रेल्वे शहरातील नगर परिषद मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू पुर्व माध्यमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक व काही शिक्षक हे कोणतीही परवानगी न घेता बाहेरगावावरून अप-डाऊन करीत असुन शाळेत वेळेवर येत नसल्याने पालकवर्ग आता आक्रमक झाले आहे. त्यांनी गुरुवारी (ता. १) चांदूर रेल्वेच्या नगरपरिषद कार्यालयावर धडक दिली व शिक्षकांवर कारवाई करून मुख्यालय राहण्याची सक्ती करण्याच्या मागणीचे निवेदन दिले.

नगर परिषद मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू पुर्व माध्यमिक व माध्यमिक शाळेतील काही शिक्षक व मुख्याध्यापक हे मुख्यालयी न राहता अमरावती तथा अकोला वरून येणे - जाणे करतात. तसेच परत जाते वेळेस सुद्धा काही लोक वेळेपूर्वीच निघून जातात. यामुळे त्यांचे शाळेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.तसेच सदर शाळेमध्ये शिक्षणाचा स्तर सुध्दा खालच्या स्तरावर गेलेला असुन येथील मुलांना मुलभूत गोष्टींचे देखील ज्ञान नाही. याला सुद्धा सदर शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक हे जबाबदार असून मुलांचे भविष्य अंधारात चालले



> **प्रशासनाने तत्काळ दखल घ्यावी - ॲड. अहेफाज राराणी**
>
> उर्दू शाळेतील काही शिक्षक व मुख्याध्यापक हे बाहेर गावावरून अप-डाऊन करीत असल्यामुळे त्यांचे विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होत आहे. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर आम्ही नगरपरिषद कार्यालयातील अधीक्षक यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले असून घरभाडे भत्ता घेऊन अप-डाऊन करणाऱ्या शिक्षकांवर कारवाईची मागणी केली आहे. बाहेर गावावरून येणारे शिक्षक मर्जीने येणे - जाणे करीत असून त्यांना मुख्यालय राहण्याची सक्ती करणे गरजेचे आहे. त्यामुळे न.प. प्रशासनाने आमच्या निवेदनाची तात्काळ दाखल घ्यावी

आहे असे पालकांचे म्हणणे आहे. त्यामुळे मुख्यालय न राहणाऱ्या शिक्षकांवर योग्य कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन नगर परिषद कार्यालयात देण्यात आले. यावेळी ॲड. अहेफाज राराणी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नुरूलहसन कुरेशी, फिरोज खान, अब्दुल गफ्फार, अनिस सौदागर, खुदाबक्श कुरैशी, सैय्यद जाकीर, नाजीम पठाण, बादर खान, गफ्फार करैशी, शेख अकबर, मोहम्मद सुलेमान, आदील सौदागर, हसन शाह, शहेजाद सौदागर, रहेमत खान, अब्दुल्ला कुरैशी, रशीद कुरैशी, नौशाद खान, नावेद खान, तनविर खान, रशीदभाई, इसराईल कुरैशी, सलमान खान, शेख अफरोज, अफसर खान, वजीद खान, समीर पठान, एजाज काझी, शेख जावेद यांसह अनेकांची उपस्थिती होती.

# राहुल गांधी यांना जात विचारणाऱ्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या मनुवादी भाजपा विरोधात अमरावती शहर काँग्रेसचे निषेध आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

भाजपच्या मनुवादी विचाराचा निषेध करण्यासाठी काँग्रेस कडून निषेध आज राज्यभरात आंदोलने करण्यात आली अमरावती शहरात हि जिल्हाधिकारी कार्यालयावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी धडक देत जोरदार आंदोलन केले. यावेळी केंद्रसरकार विरोधात जोरदार निदर्शने करण्यात आले

बबलु शेखावत यांच्या अध्यक्षतेमध्ये तसेच माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख,प्रदेश प्रवक्ते दिलीप एडतकर,माजी महापौर .मिलिंद चिमोटे,प्रदेश उपाध्यक्ष .भैय्याजी पवार,प्रदेश सचिव आसिफ





तवक्कल,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्रीताई वानखडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आले.याप्रसंगी जातीवादी राजकारण करणाऱ्या भाजपा सरकारचा निषेध असो अनुराग ठाकूरचा निषेध असो अनुराग ठाकूर यांची पाठराखण करणाऱ्या नरेंद्र मोदींचा निषेध असो जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे राहुलजी गांधी आप संघर्ष करो हम तुम्हारे साथ है अश्या नारेबाजीने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दुंमदुमुन गेला होता.याप्रसंगी संजय वाघ,विनोद मोदी, अशोक डोंगरे, बाळासाहेब घोंगडे,हाजी नजीर खान बीके, भैय्यासाहेब नीचळ, राजीव भेले,विजय वानखडे, सुनील जावरे,गोपाल धर्माळे, राजेंद्र वर्मा,श्याम देशमुख, डॉ.मतीन अहमद,वैभव देशमुख, सुजाता झाडे,शोभा शिंदे,देवयानी कुर्वे,असमा परवीन,योगिता गिरासे,वंदना थोरात,अनिला काझी,शिल्पा राऊत,शिरीन खान,अपर्णा मकेश्वर,कांचन खोडके,शिल्पा देशमुख,विकास धोटे,विजय बर्वे,गणेश भोरे, अमर देशकर,प्रकाश शिरभाते, रमेश राजोटे,आकाश तायडे, सुरेश कनोजीया,सुधीर वाळके, गजानन राजगुरे, मोहम्मद साबीर,अमर भेरडे,नाना बारबुद्धे,मोहन पुरोहित,श्रीधर पुरोहित,वीजय राठेड,अब्दुल रफिक पत्रकार,सादिक शाह, गुड्डू हमीद,सुरेश इंगळे,प्रकाश पहूरकर, सुजल इंगळे,संकेत साहू,दिनेश खोडके, जुबेर, लखन यादव,प्रा.अनिल देशमुख, शेख निसार एस.बी., मोहम्मद शोएब,असलम सलाट, राजाभाऊ चौधरी,सुरेंद्र नीमजे,नितीन लवंगे,विजय आठवले,महेश व्यास,मोहम्मद निजाम,अकील बाबू,रोहन चिमोटे,मोहम्मद शारिक ठेकेदार,सुरेंद्र देशमुख, रिजू भाई,कृष्णा गुगलमाने यांच्या सह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अमरावती विद्यापीठात म्युझियमचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

भारतीय चार्टर्ड अकाऊंटंटस् अमरावती शाखेचे अकाऊन्टन्सी म्युझियम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील एम.बी.ए. विभागात सुरू झाले असून त्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आज फित कापून केले. अमरावती सी.ए. फाऊंडेशनच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या या म्युझियमचा



वाणिज्य व व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांना मोठा लाभ होईल, असे याप्रसंगी बोलतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले. सी.ए. फाऊंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चार्टर्ड अकाऊंटबाबत मार्गदर्शन मिळेल तसेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना इटर्नशीप मिळू शकेल असा विश्वास याप्रसंगी अमरावती सी.ए. शाखेच्या पदाधिका-यांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याशी वार्तालाप करतांना व्यक्त केला.

या म्युझियममुळे विद्यार्थ्यांना पूर्वीच्या आणि सध्याच्या लेखापरिक्षणाविषयाची जाण व्हावी, त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनाही त्याचे ज्ञान मिळावे, या दृष्टीने अनेक मान्यवर सी.ए. यांचे माहिती देणारे लेख देखील पोस्टर्सरुपाने लावण्यात आल्याची माहिती एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. डी.वाय. चाचरकर यांनी दिली. यावेळी वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष सी.ए. अंकित राठी, उपाध्यक्ष सी.ए. राहुल पारेख, सचिव सी.ए. गौतम लाठ, कोषाध्यक्ष सी.ए. पिंकी केडिया, सी.ए. सौरभ अजमेरा, अमरावती सी.ए. फाऊंडेशनच्या अध्यक्ष सी.ए. अनुपमा लड्ढा, सचिव दिव्या त्रिकोटी तसेच एम.बी.ए. विभागातील सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'तपोवन' ला शनिवारी सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

स्वातंत्र्य संग्राम सेनानी पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात १९४६ मध्ये कुष्ठरोग निर्मूलनासाठी, कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनासाठी स्थापन केलेल्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ, 'तपोवन' या संस्थेला येत्या शनिवारी ३ ऑगस्ट रोजी सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे . नामवंत साहित्यिक ,समीक्षक व अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.अक्षयकुमार काळे यांच्या हस्ते एक लाख रुपये , स्मृतिचिन्ह व गौरवपत्र देऊन संस्थेचा सन्मान केल्या जाणार आहे.

इर्विन चौकातील न्यू आझाद हिंद गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणात दुपारी ४.३० वाजता आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'वनराई' चे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी , तर प्रमुख अतिथी म्हणून अमरावतीच्या आमदार सुलभाताई खोडके प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. लोक फाऊंडेशन, कृषी विकास





प्रतिष्ठान, व सोमेश्वर पुसतकर मित्रमंडळ या संस्थांच्या वतीने दरवर्षी सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतीदिनी हा पुरस्कार देण्यात येतो .सन २०२१ मध्ये 'नानक रोटी ट्रस्ट' , २०२२ ला श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल तर २०२३ यावर्षी रक्तदान समिती, अमरावती या संस्थांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती . समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारी व्यक्ती वा सामाजिक संस्था वा संघटनेला दरवर्षी हा लोकगौरव पुरस्कार दिला जातो.

**७६ वर्षापासून काम करतेय 'तपोवन'**

२०२४ च्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेली 'तपोवन' ही संस्था केवळ अमरावतीतच नव्हे संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या सेवाभावी कार्यासाठी ओळखली जाते. मागील ७६ वर्षापासून अविरतपणे कुष्ठसेवेचे कार्य करणारी ही संस्था अजूनही त्याच जोमाने काम करीत ६५० कुष्ठरुग्णांचा सांभाळ करीत आहे. कुष्ठरुग्णांचा फक्त इलाज न करता त्यांना स्वावलंबी बनवणे, त्यांना आपल्या पायावर उभे करणे आणि त्यांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देणे, हा मुख्य हेतू समोर ठेवून डॉक्टर शिवाजीराव पटवर्धन यांनी या संस्थेची स्थापना केली होती. या कार्यक्रमाला अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लोक फाऊंडेशन, कृषी विकास प्रतिष्ठान, व सोमेश्वर पुसतकर मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# विद्यापीठात साहित्यरत्न श्री अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ अमरावती**

कामगार नेते, कथा, कादंबरीकार, कवी, नाटए कलावंत, लोकशाहीर, साहित्यसम्राट श्री अण्णाभाऊ साठे यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी श्री अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठए संख्येने उपस्थित होते. संचालन व श्री अण्णाभाऊ साठे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.